आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २४ फेब्रुवारी २०२३
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१८०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 24 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-180 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5







## महत्वाची बातमी

### नांदेड विद्यापीठाचा एलएलबीचा निकाल प्रचंड घसरला



आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या एलएलबी शाखेचा हिवाळी 2022 परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यंदा निकालात प्रचंड घसरण झाली असून 100 विद्यार्थ्यांमागे केवळ 12 विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने चिंता वाढली आहे. हीच परिस्थिती इतरही विद्याशाखांची आहे. नांदेड विद्यापीठाच्या एलएलबी हिवाळी 2022 परीक्षा डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात पार पडल्या. या परीक्षेचा निकाल 17 फेब्रुवारी रोजी वेबसाईटवर ऑनलाइन जाहीर झाला. यंदा निकालाचा टक्का प्रचंड प्रमाणात घसरला असून अनेक विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. 100 विद्यार्थ्यांमागे केवळ 12 विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याचे दिसून येते. दरम्यान, एलएलबी तृतीय वर्ष आणि बीएसएल अंतिम वर्षाच्या ज्या विद्यार्थ्यांचे एक किंवा दोन विषय बॅक राहिले आहेत, त्यांना आता नवीन अभ्यासक्रम आणि नवीन पॅटर्नप्रमाणे परीक्षा द्याव्या लागणार असल्याने विद्यार्थ्यांची डोकेदुखी आणखी वाढली आहे. आधीच एखादा विषय बॅक राहिलेले विद्यार्थी पदवीपासून वंचित आहेत, आता या विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा द्याव्या लागणार आहेत.

# एमपीएससीचा नवा अभ्यासक्रम २०२५ पासून; आयोगाचा निर्णय

## अखेर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश




आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. एमपीएससीने एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची मागणी, आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न लक्षात घेऊन नवा अभ्यासक्रम २०२५ सालापासून लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सुधारित परीक्षा योजना तसेच नवा अभ्यासक्रम २०२५ सालापासून लागू करण्यात येईल असे एमपीएससीने सांगितले आहे. त्यामुळे एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.**

एमपीएससीने हा निर्णय घेतल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे आभार मानले आहेत. “विद्यार्थ्यांची जी मागणी होती त्या प्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निर्णय घेतला आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आम्हाला या प्रकरणात राजकीय श्रेय घ्यायचे नव्हते. मात्र काही लोक विद्यार्थ्यांच्या आडून त्याला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करत होते, असे एकनाथ शिंदे म्हणाले. एकनाथ शिंदे यांनीदेखील या निर्णयानंतर समाधान व्यक्त केले आहे.

एमपीएससीने सुधारित परीक्षा योजना तसेच नवा अभ्यासक्रम २०२५ पासून लागू करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाबाबतची माहिती एमपीएससीने ट्विटरवर दिली आहे. एमपीएससीने आपल्या ट्वीटमध्ये “राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या वर्णनात्मक स्वरूपाच्या परीक्षेसंदर्भातील उमेदवारांची मागणी, कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती व उमेदवारांना तयारीसाठी द्यावयाचा अतिरिक्त कालावधी विचारात घेऊन सुधारित परीक्षा योजना व अभ्यासक्रम सन २०२५ पासून लागू करण्यात येत आहे, असे सांगितले आहे.



एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पुण्यात आंदोलन केले जात होते . या आंदोलनाला विरोधी पक्षाच्या नेत्यांनी पाठिंबा दिला होता . अनेक नेत्यांनी विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता . राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनीदेखील आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांची भेट घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी फोनद्वारे चर्चा केली होती . त्यानंतर राज्य सरकारने एमपीएससीचा नवा अभ्यासक्रम २०२५ सालापासून लागू करावा, अशी विनंती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे केली होती . महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ही मागणी आता मान्य केली आहे .

# उर्वरित सत्य सुद्धा बाहेर येईलच!

## पहाटेच्या शपथविधीवर देवेंद्र फडणवीस यांचे गूढ संकेत

आधुनिक केसरी न्यूज

**लोणी :** हळूहळू जे गौप्यस्फोट होताहेत, हे चांगलेच आहेत. मी जे बोललो तेच खरे होताना दिसते आहे. आतापर्यंत अर्धेच बाहेर आले आहे. अजून अर्धी गोष्ट बाहेर यायची आहे. काळजी करु नका, संपूर्ण गोष्ट सुद्धा बाहेर येईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी सांगितले.


नगर जिल्ह्यातील लोणी येथे आयोजित महसूल परिषदेला संबोधित केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आज सकाळी सुप्रिया सुळे या भावी मुख्यमंत्री असे फलक लागल्यासंदर्भात पत्रकारांनी प्रश्न विचारले असता ते म्हणाले, भावी पंतप्रधान, भावी मुख्यमंत्री अशी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पद्धत आहे, त्यामुळे ते तसे सांगतात. उद्धव ठाकरे कधी मुख्यमंत्री होतील, असे कुणाला वाटले तरी होते का, राजकारणात काहीही होत असते. त्यामुळे ज्याला ज्याला जे-जे भावी वाटत असेल, त्याला त्यासाठी शुभेच्छा आहेत. पोटनिवडणुकीत प्रचाराला जात असल्याबद्दल पत्रकारांनी विचारले असता फडणवीस म्हणाले की, सर्वच पोटनिवडणुकांमध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री गेले आहेत. आता यंदाच्या पोटनिवडणुकीत स्वतः शरद पवार गेले आहेत. यापूर्वीच्या कोणत्याही पोटनिवडणुकीत ते गेले नाही. त्यांना काही ना काही



वाटत असेल म्हणून तर स्वतः पवार साहेब जात आहेत ना? आणि तशीही निवडणुकीत मतदारांना भेटताना लाज कशाची?

आमची वैचारिक विरोधक आहोत, शत्रू अजीबात नाही. महाराष्ट्रात एक वेगळी राजकीय संस्कृती आहे. अलिकडच्या काळात एक शत्रूत्त्वाची भावना पहायला मिळते. पण, ती आपल्याला संपवावी लागेल. उद्धवजी आणि आदित्य यांनी वेगळा राजकीय मार्ग पत्करला, आमचा मार्ग वेगळा आहे. त्यामुळे आम्ही शत्रू नाही, तर वैचारिक विरोधक आहोत, असे एका प्रश्नाच्या उत्तरात फडणवीस म्हणाले. शिवसेनेतील फूट फडणवीसांनी केली, या आरोपांसंदर्भात पत्रकारांनी विचारले असता संजय राऊतांना माझी क्षमता अधिक वाटत असेल. त्याबद्दल त्यांचे आभार मानू या. पण, अलिकडे संजय राऊत जे बोलतात ते अजीबात गांभीर्याने घेण्यासारखे नसतात. ते एका राजकीय पक्षाचे प्रवक्ते आहेत, त्यामुळे त्यांनी वस्तुस्थिती पाहून किंवा लोकांना खरे वाटेल, असे बोलले पाहिजे. अर्थात तो त्यांचा प्रश्न आहे. पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेसंदर्भात केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे बैठक झाल्यानंतर आता केंद्रीय मंत्रिमंडळात तो प्रस्ताव जाईल आणि या प्रकल्पासाठी कुठलाही निधी कमी पडू दिला जाणार नाही, असेही फडणवीस यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. या महसूल परिषदेत मोजणीच्या संदर्भातील चांगली व्यवस्था, वाळूसंदर्भातील अडचणी सोडविण्याचा तसेच व्यवस्था अधिक पारदर्शी करण्यासंदर्भातील पद्धतींवर चर्चा झाली. गैरकृषीसंदर्भातील समस्यांचे निराकरण, एकाच अर्जावर इतर प्रमाणपत्र, जलयुक्त शिवार योजना टप्पा 2 तसेच आवास योजना मिशन मोडवर राबविणे, कृषीफीडर सौरउर्जेवर आणणे आणि किमान 4000 मे. वॅ. वीज सौरउर्जेवर आणणे इत्यादींबाबत यावेळी चर्चा झाली. या परिषदेमुळे महसूल विभागाच्या कामाला चांगली गती येईल, असा पूर्ण विश्वास मला आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



## उगवतीचे रंग


विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## स्वामी कृपा

त्या आजीनी स्वामींना नैवेद्य म्हणून मेथीचे आणि डिंकाचे लाडू आणले होते. मग स्वामींना त्या लाडवांचा नैवेद्य दाखवण्यात आला. मग आरती होऊन तेथे जमलेल्या उपस्थिताना प्रसाद वाटण्यात आला. स्वामींजवळ जे डिंक आणि मेथीचे लाडू नैवेद्य म्हणून ठेवले होते, ते रंजनाताईंनी उचलले. त्यांना असे दिसले की एका लाडवावर एक बदाम खोचलेला होता, तो बदाम आता नाहीसा झाला होता. त्यांनी त्या आजींना सांगितले की आज तुमच्या नैवेद्याचा स्वीकार स्वामींनी केला आहे. हा चमत्कार पाहून सगळ्यांनाच मोठा आनंद आणि आश्चर्य वाटले आणि सगळ्यांनी भक्तिभावाने स्वामींना हात जोडले. रेश्माला वाटले आज आपण लाडू आणले असते तर, आपलाही नैवेद्य स्वामींनी ग्रहण केला असता. या विचाराने मन जरा खट्टू झाले. तिची नाराजी पाहून रंजनाताईंनी तिची समजूत घातली. त्या म्हणाल्या, 'तू सगळे मनोभावे करते आहेस. स्वामी निश्चितच तुझा नैवेद्य स्वीकारतील. तू नाराज होऊ नकोस.' रेश्मा पुढे आपल्या नियोजित मीटिंगसाठी गेली. ती मीटिंग जरा लांबली पण तिला एका पार्टीची ऑर्डर मिळाली. संध्याकाळच्या मीटिंगमध्ये तिला एका साखरपुड्यासाठी ऐंशी लोकांच्या जेवणाची ऑर्डर मिळाली.





## आनंदी पहाट

### रंगांचा परिणाम थेट अंतर्मनावर

आधुनिक केसरी

व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यामुळे एकाच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी, सवयी, मानसिकता हे देखील सर्व भिन्न असतं. या भिन्न विभिन्न मानसिकतेचा विचार करून सकारात्मकता आणि एकता निर्माण करावी लागत असते. यामध्ये कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा कस लागत असतो. अंतर्मनाच्या आणि मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून रंग शास्त्राचा खूप मोलाचा वाटा असतो. रंगांचा संबंध थेट अंतर्मनाशी असतो. विविध रंग अंतर्मनाला जाऊन भिडणारे असतात. प्रत्येक रंगामुळे आपल्या अंतर्मनात निरनिराळे भाव प्रकट होत असतात. निरनिराळ्या रंगांमुळे निर्माण झालेल्या आपल्या भावना आपण उत्स्फूर्तपणे व्यक्त करत असतो. त्यामुळेच रंगशास्त्र आपल्या जीवनांत अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असतात. कोणत्या रंगाचा कोठे, कसा, किती, का आणि केव्हा वापर करायचा हे पाहाणे अत्यंत आवश्यक असतं. प्रत्येक व्यक्तीच्या आवडीप्रमाणे रंगाची पसंती केली जात असते. याचा प्रत्यय आपल्याला दैनंदिन जीवनात प्रत्येकाच्या पेहरावाच्या निवडीवरून दिसून येतो. एखाद्याला एखाद्या दिवशी निळ्या रंगाचे कपडे वापरावेसे वाटतील तर दुसऱ्याला पिवळ्या रंगाचे. अर्थातच हे प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेवर अवलंबून असतं. अनेकदा आपल्या शारीरिक दुखण्यामागे खरं तर मानसिक अस्वस्थता कारणीभूत असते. रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग असे मोठे आजार अथवा डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ, चक्कर अशी छोटी दुखणी अनेकांना त्यांच्या मानसिकतेमुळे उद्भवलेली असतात. आपण आपलं मानसिक स्वास्थ्य मिळवणं आणि ते टिकवून ठेवणं हे सर्वस्वी आपल्याच मानसिकतेवर, अंतर्मनातील विचारांवर अवलंबून असतं. आपल्या अंतर्मनाला आनंदी ठेवण्यातच आपलं मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवता येतं. तो आनंद आपण स्वतःच निर्माण करायचा असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**विराट स्वरूप | अद्वैताचे ||**
निर्गुणाचा संग | लाभता मनाला ||
देह आनंदला | सगुणात ||१||
रोम रोमी नाद | हरिनाम गुंजे ||
ज्ञाना-तुका रूंजे | काळजात ||२||
अवघेचि विश्व | एक झाले आता ||
पांडुरंग त्राता | चराचरी ||३||
द्वैताची जाणिव | लोपली गे माये ||
आत्माराम पाहे | अंतःचक्षु ||४||
दर्पणात दिसे | गोविंदाचे रूप ||
विराट स्वरूप | अद्वैताचे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

आधी आणि नंतर विचार हा विचारच असतो. विचार कोणी मांडला हे गौण होय. विचाराची स्वीकृती ही विचारानेच झाली पाहिजे.

आपल्याकडून सर्व दिशांना चांगले विचार जातील आणि सर्व दिशांकडून आपल्याकडे चांगले विचार येतील याची काळजी घे.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**मन माया की चाल में, भूलि परे सब जीव । गुरु बिनु सो नहिं लखि परे, किमि पावे निज पीव ।।१६।। (स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/१६**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

मन-मायेच्या चालमधे म्हणजेच जाळ्यात सर्व जीव गुरफटलेले आहेत. त्याची चाल सद्गुरूआधाराशिवाय कोणालाही दिसू शकत नाही , मग ते परमेश्वराला कसे प्राप्त करू शकतील ? सद्गुरूंच्या आभ्यंतर-साधन-भेदाच्या प्रयत्नाने मन-मायेचा संबंध सुटून मनाची गती दृष्टिस पडते.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

मित्रांनो आपल्याला परमार्थाकडे जायचें आहे परमात्मा ओळखायचा आहे तिकडे जाण्यासाठी मार्ग दाखवण्यासाठी वाटाडा लागतो तो वाटाडा कोण ? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल तर !



'संत' हे त्याचे ऊत्तर आहे मित्रांनो. अशा संतांना आपण वंदन करूया भक्तिमार्गाचा रस्ता सुलभ होण्यासाठी श्रवण, मनन, निदिध्यास यांची गरज असते. समर्थ श्रवण हा शब्द फार व्यापक अर्थाने मांडतात. उपनिषदांमध्ये सांगितलेला आत्मदर्शनाचा मार्गच श्री समर्थांनी आपल्याला'दासबोधा मध्ये'सांगितला आहे. आपण सतत मनन, चिंतन श्रवण भक्तिने परमार्थाकडे वळतो व आपल्या आयुष्यात परमानंद मिळवतो. श्रवणभक्तिचा हा फायदा आहे.ज्ञानमार्ग, योगमार्ग, भक्तिमार्ग, शक्तिमार्ग असो, मनाची संपूर्ण एकाग्रता होऊन ध्यानावस्थेत एकत्र गोळा होणारें मन हे काही अचानक तयार होत नाही त्यासाठी त्याच्यावर ध्येयाचें संस्कार सतत करावे लागतात. ध्येय हे काही बाजारात जाऊन खरेदी करायची वस्तू नाही मित्रांनो, की बाजारात जाऊन एक किलोध्येय द्या असे आपण म्हणू शकत नाही त्यासाठी निदिध्यास असणें गरजेचे आहे. ध्येयाचे संस्कार सतत सत्संगात राहिल्याने होतात. त्यासाठी सतत कानावर आदर्शवत विचार बालपणापासून रूजवले गेले पाहिजे त. घरातील वातावरण सात्विक, परोपकारी, ऊच्चध्येयमुल्ये जोपासणारे असावे लागते. हे सर्व संस्कार कर्म ज्या ज्या घरात होतात तिथेच देवाचा वास असतो. सद्विचार व संस्कार खोल रूतून मनाचा अविभाज्य घटक होण्यासाठी त्या संस्काराचे रवंथ करवे लागते. एकच विषय मनात पुष्कवेळा घोळवण्याचे कार्य मनाने साधते. योग्य अधिकार संपन्न व्यक्ति कडून नित्य श्रवण केल्याने मननाला सतत प्रेरणा मिळते. आपणही चांगले आचार विचार, ध्येय ठेवावेत व सतत चांगल्याप्रकारे श्रवण करत रहावे बाकी सर्व रामरायावर सोपवावे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## कळकळीचे नामस्मरण

आधुनिक केसरी

आम्ही सुस्थितीत असलो म्हणजे आमचे नामस्मरण अधिक होते. त्यात काही बिघाड झाला की तिकडेच सारे लक्ष वेधते. याला कारण म्हणजे आमचे स्मरण हे वरवरचे असते. श्रद्धेने नामस्मरण करणे आपल्याला कठीण जाते. परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही असा दृढ निश्चय अगर श्रद्धा असणे आवश्यक आहे. म्हणजे मग प्रकृतीत काही बिघाड झाला तरी आपले स्मरण टिकून राहील. द्रौपदीला आता आपला कोणी त्राता नाही असे वाटून जेव्हा तिने श्रीकृष्णाचा धावा केला, तेव्हा भगवान् लगेच धावून आले. असे खऱ्या कळकळीचे स्मरण आपले असायला पाहिजे. जसे लहान मूल काहीही झाले तरी आपल्या आईलाच हाक मारते, दुसरे तिसरे कोणी जाणत नाही, तसे आपले परमेश्वर-स्मरणाच्या बाबतीत झाले पाहिजे. आपली भिस्त खरोखर कोणावर आहे हे संकटकाळीच उत्तम कळते.

नामस्मरणाच्या पायऱ्या अशा सांगता येतील - पहिली, सुस्थितीतले वरवरचे स्मरण; दुसरी, परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही ही जाणीव होऊन, संकटसमयी त्याचे स्मरण; आणि तिसरी, हीच जाणीव दृढ होऊन पुढे अखंड होणारे नामस्मरण. यांपैकी वरवर स्मरण करणारा 'आम्हांला संकटेच नकोत' असे म्हणतो, तर साधुसंत 'आम्हांला संकटे येऊ देत' असे भगवंताजवळ मागतात, कारण त्यावेळेसच त्याचे खरे स्मरण होते. आपण स्वतः आहोत याची आपल्याला आज जितकी खात्री आहे, तितकी खात्री



भगवंत आहे अशी झाली पाहिजे. परमात्मा सर्व ठिकाणी आहे की कल्पना केव्हा तरी आपल्याला होते खरी, पण ती कायम न राहिल्यामुळे दृढपणे आपल्या आचरणात येत नाही; आपली वृत्ती तशी झाली की ती आपल्या आचरणात येईल. भगवंत हा कर्ता आहे अशी आपली दृढ भावना झाली की आपण प्रत्येक गोष्ट त्याला सांगत बसणार नाही, 'भगवंताला माझे सर्व कळते' असे जर खरेच वाटले तर त्याला आवडेल असेच आपण वागू. पहाटे उठावे आणि भगवंताची मूर्ती डोळ्यांसमोर आणून प्रार्थना करावी, आणि "तुझे विस्मरण जिथे होते, तिथे मला जागृत करीत जावे; नाही मला आता तुझ्याशिवाय आसरा," असे म्हणून त्याला मनःपूर्वक नमस्कार करावा. मनुष्य कसाही असला तरी भगवंताच्या स्मरणात त्याला समाधान खात्रीने मिळेल. जो भगवंताचा झाला त्याला जगण्याचा कंटाळा कधीच येणार नाही. विषयाचा आनंद हा दारूसारखा आहे; ती धुंदी उतरल्यावर मनुष्य जास्त दुःखी बनतो. 'मी भगवंताचा आहे' या भावनेने जो राहील त्यालाच खरा आनंद भोगता येईल.

**आजचे बोधवचन आहे** - भोग व दुःख यांत वेळ न घालविता भगवंताकडे लक्ष दिले पाहिजे. श्रीराम समर्थ

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
adhunikkesari.com Adhunik Kesari



# जिद्द निर्माण करा, यश हमखास : प्रा.डॉ. प्रकाश रोडिया

## 'दयानंद वाणिज्य'मध्ये स्व.मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेला उत्स्फूर्त प्रतिसाद



आधुनिक केसरी न्यूज

लातूर : परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी चुकीच्या पद्धतीचा अवलंब न करता आपल्या ब्रेनचा पुरेपूर वापर करत वेळेचे नियोजन करून कुठल्याही प्रकारचा तणाव न घेता यश मिळवावे. त्यासाठी प्रथमता वेळेचे नियोजन, योग्य आहार, योग्य मार्गदर्शन व स्वतःमध्ये असलेली जिद्द हीच यश मिळवण्याची खरी गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन राजर्षी शाहू महाविद्यालय लातूरचे प्रा.डॉ. प्रकाश रोडिया यांनी दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित मासिक व्याख्यानमालेत "परीक्षेला सामोरे जाताना...आव्हाने आणि संघर्ष" विषयावर बोलताना केले.

### हार-तुरे देण्याऐवजी वृक्ष रोप देण्याची परंपरा

दयानंद वाणिज्य महाविद्यालयात आलेल्या पाहुण्यांना हार-तुरे देण्याऐवजी वृक्ष रोप देण्याची परंपरा आहे. हार-तुरे दिल्यानंतर ते केवळ फोटोत आणि देताना छान वाटतात. पण त्याचा उपयोग होत नाही. यामुळे आलेल्या प्रत्येक पाहुण्याला हार-तुरे, बुके देण्याऐवजी वृक्ष भेट देण्याची परंपरा दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने सुरू केली आहे. या उपक्रमाचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे. व्याख्यान कार्यक्रमास आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांना गुलाबाचे रोप भेट देण्यात आले.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ.राजाराम पवार होते. याप्रसंगी मंचावर ज्येष्ठ नागरीक सत्यनारायणजी लड्डा, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रा.योगेश शर्मा उपस्थित होते. आपल्या व्याख्यानपर मार्गदर्शनात पुढे बोलताना डॉ. प्रकाश रोडिया म्हणाले, कोरोना जाऊन आता अनेक दिवस झाले, तरी आपण कोरोना सोबत घेऊन फिरत आहोत. विद्यार्थ्यांनी कुठल्याही प्रकारची भीती मनात न बाळगता ज्ञान मिळवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, परीक्षेला न घाबरता पूर्ण तयारीनिशी परीक्षांना सामोरे जाणे गरजेचे आहे. परीक्षा आपल्यातील गुणांना सिद्ध करण्यासाठी असते. मनामध्ये कुठलीही शंका न ठेवता ध्येय ठेवून वाटचाल केल्यास यश आपल्या हातात आहे, याचा विद्यार्थ्यांनी विचार करावा. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रसिद्धी विभागप्रमुख प्रा. योगेश शर्मा यांनी केले. यावेळी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांमध्ये कोरोना काळानंतर परीक्षेला सामोरे जाताना असलेला संभ्रम दूर करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती त्यांनी दिली. कोरोना काळानंतर विद्यार्थ्यांचे अभ्यास करण्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत आहे, त्याचा परिणाम गुणवत्तेवर होत असल्याचे चित्र आज दिसत आहे. हे बदलण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज असून त्यात प्रमुख भूमिका स्वतः विद्यार्थ्यांची असणार आहे.

आपली गुणवत्ता वाढवण्यासाठी महाविद्यालयात उपस्थित राहून आपल्या अडचणी सोडवून घेऊन विद्यार्थ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.राजाराम पवार यांनी व्यक्त केले. तर सूत्रसंचालन प्रा. अक्षय पवार, पाहुण्यांचा परिचय प्रा.निखिल व्यास व आभार प्रदर्शन प्रा.अजय चव्हाण यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी व सेवकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी विश्वास कुलकर्णी, संजय व्यापारी तसेच प्रा.डॉ. कविता बियाणी आदींसह प्राध्यापकांची व मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### विद्यार्थ्यांनी साकारलेल्या रांगोळीचे कौतुक

याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एक लक्षणीय रांगोळी त्या ठिकाणी सभागृहाबाहेर काढली होती. अनेकांचे लक्ष या रांगोळीने याप्रसंगी वेधून घेतले होते. या रांगोळीचे पाहुण्यांनी कौतुक केले. रांगोळी काढणारे कलावंत विद्यार्थी वैष्णवी सगरे, वैष्णवी बनसोडे, ज्योती मिसाळ, तृप्ती साळुंखे, दरेकर बबीता, वैष्णवी शेंडगे, अभिषेक जाधव या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांनी विशेष सत्कार केला.







# पारा चढला

आधुनिक केसरी

नवीन वर्षाची सुरुवात कडाक्याच्या थंडीने झाली आहे. मात्र फेब्रुवारी महिना उजाडताच तापमानात वाढ झालेली पाहायला मिळत आहे. फेब्रुवारी महिन्यातच उन्हाच्या झळा बसण्यास सुरुवात झाली आहे. फेब्रुवारी महिना अर्धा संपला असून तापमानात झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. घराबाहेर पडले की, घामाच्या धाराच लागतात. फेब्रुवारी महिन्यात जाणवणारी गरमी उन्हाळ्याची चाहूल असल्याचे म्हटले जात आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये तापमानात झालेली वाढ पाहता यंदाचा उन्हाळ्यात अधिक उष्णतेचा मारा सहन करावा लागणार, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. फेब्रुवारीतील वाढलेले तापमान आणि उष्णता पाहता मे-जून महिन्यामध्ये कडक ऊन पडण्याची चिन्हे असल्याची भीती निर्माण झाली आहे. यंदाचा उन्हाळा कसा असेल, किती ऊन असेल आणि उन्हाळ्याचे काही महिने कसे जाणार आहेत, मे आणि जून महिन्यात तापमान कसे असेल, लोकांच्या मनात असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. या प्रश्नांची उत्तर जाणून घ्या. तसेच फेब्रुवारी महिन्यात तापमान वाढण्याचे कारण काय आहे तेही वाचा. फेब्रुवारी महिना सरत आला असून तापमानात वाढ झालेली पाहायली मिळत आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, गोवा आणि कर्नाटकात तापमानात सातत्याने वाढ होऊ लागली आहे. सध्या या राज्यांमध्ये अनेक ठिकाणी 35 ते 39 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तापमान फारसं कमी होणार नसल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्लीमध्ये तापमान 28-33 अंशांवर पोहोचले आहे, हे तापमान सामान्य स्थितीपेक्षा पाच ते नऊ अंशांनी जास्त आहे. यंदा फेब्रुवारी महिन्यामध्ये तापमानात मोठी वाढ झाल्याचे दिसत आहे. काही भागांत अगदी मे महिन्याप्रमाणे उन्हाच्या झळा बसत आहेत. कोणतेही वेस्टर्न डिस्टर्बन्स नसल्यामुळे म्हणजेच पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांचा प्रभाव नसल्याने आणि डोंगरावर कमी हिमवृष्टी झाल्यामुळे मैदानी भागात उष्णता वाढत आहे. दरवर्षी फेब्रुवारीत काही ना काही बदल होत असल्याने फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी थंडीची चाहूल लागते. यंदाही फेब्रुवारीत शेवटच्या दिवसांमध्ये काही भागात तापमान घसरणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील पाच दिवस पहाटेच्या किमान आणि दुपारच्या कमाल तापमानात सध्याच्या पेक्षा काहीशी घसरण होणार आहे.

# अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना विषमतेने वागवू नये



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**दैनिक लोकमत मधील 12 फेब्रुवारी 2023 च्या अंकात पगार वाढ रोखल्याने 'आरपीएफ सबइन्स्पेक्टरची केली हत्या'या शीर्षकाची बातमी वाचली. खरे तर नोकरीत असणारा कर्मचारी हा आपली नोकरी टिकावी, आपला पोटापाण्याचा प्रश्न आहे, घर संसार नीट चालावा, लेकर बाळ आहेत म्हणून तो जीवाचा आटापिटा करून अगदी पद्धतशीरपणे नोकरी करण्याचा आणि टिकवण्याचा प्रयत्न करत असतो. नोकरी म्हणजे काय? नोकरी मिळवण्यासाठी काय काय करावे लागते? किती मेहनत घ्यावी लागते ! किती कष्ट उपसावे लागतात. अनेकांचे उंबर्डे झिजवावे लागतात. हे त्याला चांगलेच माहीत असते. म्हणून अधिकाऱ्याने सांगितलेली सर्व कामे तो इमाने इतबारे करण्याचाही प्रयत्न करत असतो.**

त्याच्याकडून एखाद्या वेळेला चुकही होत असेल त्यावेळी अधिकाऱ्याने त्याला समजून सांगणे महत्त्वाचे असते. परंतु अधिकारी मात्र अनेक कर्मचाऱ्यांना विषमतेची वागणूक देत असतात. काही मोजक्या त्याच्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना आपल्या दालनात घेऊन बसणे. जे जवळची आहेत त्यांना महत्त्वाची कामे देणे. त्यांचा मान सन्मान कसा होईल त्यासाठीच प्रयत्न करणे. जे स्वाभिमानाने राहु इच्छितात, अधिकाऱ्याच्या गुलामगिरीला झुगारून देतात, अधिकाऱ्याची हांजीहांजी करत नाहीत त्यांना मात्र अधिकारी जाणूनबुजून त्रास देताना दिसतात. अधिकारी आपापल्या कार्यालयात नियमाने वागण्याच्या ऐवजी हुकूमशाही पद्धतीने आणि मी म्हणेल तोच कायदा अशा पद्धतीने वागताना दिसतात. त्यामुळे अशा वागण्याचा कर्मचाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. कर्मचाऱ्यांची त्रास सहन करून करून त्याची सहनशीलता संपते. मग तो त्या अधिकाऱ्याची तक्रारही वरिष्ठ अधिकाऱ्याकडे करतो तरीही त्या अधिकाऱ्याची चौकशी होत नाही. तक्रारीची दखलही वरचे अधिकारी घेत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तक्रारीची दखल न घेणे म्हणजे त्या अधिकाऱ्याला साथ देणे असा त्याचा अर्थ होतो. असे म्हणतात की वरच्या अधिकाऱ्याचाही त्याच्यात म्हणजे त्या भ्रष्टाचारात वाटा असतो. म्हणून तो तक्रार केली तरीही काहीच बोलत नाही.हे खरे आहे की, अनेक अधिकारी पैसे घेऊन कामे करतात. एखाद्याने पैसे दिले नाहीत तर त्याला मात्र प्रचंड त्रास दिला जातो. त्याचे काम केले जात नाही. एवढेच काय तर तक्रार केल्याचा राग मनात धरून पुन्हा अधिकारी त्या कर्मचाऱ्याला त्रास देण्यास, त्याला पत्र देण्यास, इतरांना त्याच्या जवळ जाऊ न देणे, त्या कर्मचाऱ्याला वाळीत टाकणे, त्याचा रजेचा अर्ज मंजूर न करणे, कर्मचाऱ्यांचे पदोन्नती रोखणे, त्याची वेतनवाढ रोखणे, बंद करणे, कार्यालयातील नको ती कामे सांगणे एवढेच काय तर एखाद्याच्या आयुष्यही संपून टाकण्यासाठी ते मागेपुढे पाहताना दिसत नाहीत.अशा पद्धतीने त्रास देण्यास सुरुवात करतो. हे अधिकाऱ्याचे वागणे कर्मचाऱ्याला असाह्य होते. जीवघेणा त्रास त्याला सहन होईनासा होतो. विचार करून करून त्याची क्रयशक्ती कमी होते. आपण इतके चांगले वागूनही त्याचा फायदा काय ? हा प्रश्न त्याला सतत सतावत असतो. मग त्यातून हत्यासारखे प्रकार पुढे येतात. असे प्रकार घडणे हे निषेधार्य आहे. अशा घटनांचा निषेध करायलाच हवा. असे प्रकार घडू नाहीत म्हणून अधिकाऱ्यांनी आपल्या हाताखालचा कर्मचारी हा ही माणूस आहे. त्यालाही मान,सन्मान, प्रतिष्ठा आहे. इतराप्रमाणे त्यालाही समतेची वागणूक देणे गरजेचे आहे.. हे ओळखून वागणे महत्त्वाचेच आहे. अनेक अधिकारी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना तर अत्यंत वाईट वागणूक देताना दिसतात. गाडी धुवायला लावणे, घरचा भाजीपाला आणायला लावणे, वेळप्रसंगी शेतातले कामे



सांगणे असे अनेक प्रकार वरचेवर वाढताना दिसत आहेत. अशावेळी तो कर्मचारीही वैतागून जातो. तो विचार करतो की मी काय शेतातला शेतगडी आहे की घरी काम करणारा कामगार आहे. अशी कमीपणाची भावना त्याच्या मनात निर्माण करण्यास अधिकारी प्रवर्त करताना दिसतात. म्हणून या सर्व गोष्टीचा विचार करून अधिकाऱ्यांनीही वागायला हवे. वरच्या अधिकाऱ्यांनीही तक्रारीची दखल घेऊन वेळोवेळी या अशा प्रकरणांचा विचार करायला हवा. तरच मग कुठेतरी प्रशासनात सुव्यवस्थित पणा दिसून यायला लागेल. आज प्रशासन व्यवस्था प्रचंड मोठ्या प्रमाणावर सगळ्याच क्षेत्रातील डळमळीत झाली आहे. कुणाचाच कुणावर वचक राहिला नाही. सर्वसामान्यांचे कामे सरकारी कार्यालयाकडून होताना दिसत नाहीत. त्यांच्या फाईल एका टेबल वरून दुसऱ्या टेबलवर जात नाहीत. अशा अनेक टेबलांचा भार त्या सर्वसामान्य माणसांना सहन करावा लागतो. एवढेच काय वरचा अधिकारी खालच्याला सतत सतत दाबण्याचा प्रयत्न करत असतो. त्यामुळे एकमेकांमध्ये एक द्वेष भावना, वैर भावना निर्माण होताना दिसत आहे. आज काल तर जाती, धर्माचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर वादळ निर्माण झाले आहे. ते वादळही सरकारी कार्यालय, निम सरकारी कार्यालय, मंत्री, अधिकारी व प्रशासनातही आले आहे. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होताना दिसत आहेत. न्याय देतानाही त्या जातीय, धर्मीय वादळाकडे पाहिले जाते त्यावरूनच न्याय दिला जातो. एखाद्याचे काम करायचे की नाही हेही त्यावरूनच ठरवले जाते. सांस्कृतिक, शैक्षणिक व इतरही क्षेत्रेही या जातीय, धर्मीय वादळाने प्रचंड पोखरली आहेत. एखाद्याला कार्यक्रमाला बोलवायचे असेल किंवा कुणाला पुरस्कार द्यायचा असेल तर त्याची जात बघितली जाते. ही वस्तुस्थिती मानवतेला काळीमा फासणारी आहे. लोकशाहीला घातक आहे. तरीही मंत्री, अधिकारी, न्यायव्यवस्था यांनी तरी याकडे लक्ष देऊन ही वादळे थोपवायला हवीत पण तेही आता यामध्ये घुसताना दिसत आहेत. त्यांच्याकडूनही न्याय मिळताना दिसत नाही ही गंभीर बाब आहे. आज मोठ्या प्रमाणावर शिकलेली सुशिक्षित माणसेच या भावनेने विचित्र आणि विक्षिप्तपणे वागताना दिसत आहेत. आज-काल सरकारी कार्यालये, संस्था हे अधिकाऱ्यांना कुरणं वाटायला लागली आहेत. त्यांना त्यामध्ये जसे चरायचे म्हणजे मनमानी करायची तसे ते करताना दिसत आहेत. कारण त्यांच्या तक्रारी करूनही वरच्या मंत्री, संत्र्याचे हात त्यांच्या पाठीवर असतात. त्यामुळे त्यांचे काहीच कुणी बिघडवू शकत नाही. ही भावना त्यांच्यात जास्त बळावते.त्यामुळेच की काय मानवतेची प्रचंड घुसमट होताना दिसत आहे. ह्या भयानक अवस्थेतून आज अनेक सामान्य नोकरदार माणसं वावरताना दिसत आहेत. त्यांच्यासमोर रोजची रोज वेगवेगळी प्रश्न भयानकता घेऊन उभी टाकत आहेत. त्यांना सतत घाबरवलं जात आहे. त्यांची अवस्था जिवंत असूनही मेल्यासारखे करून टाकत आहेत. एवढेच काय तर अनेक जण या भीतीने आपली जीवन यात्राही संपून टाकताना दिसत आहेत. ही भयानकता वरचेवर वाढत आहे. त्यामुळे या सर्व भयानकतेचा विचार वरच्या अधिकाऱ्याने, मंत्र्यांनी व प्रशासनाने करायला हवा. तरच सर्वांना योग्य न्याय मिळेल व अशा प्रकारचे प्रश्न घडताना दिसणार नाहीत. नाहीतर येणाऱ्या काळातली नवीन पिढी ही असे काही सहन करण्यासारखी नाही. त्यामुळे ते सहन करणार नाहीत हे अधिकाऱ्याने लक्षात घेऊनच आपले कार्य हे समतेने करायला हवे. त्यातच लोकशाही हित आणि मानव हित आहे.

# गडकिल्ल्यांची राज्य सरकारने जोपासना करावी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती हा एक महाराष्ट्राचा उत्सवाचा सण आहे. त्यामुळे 19 फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा केल्या जातो.सन 1869 साली महात्मा जोतिबा फुले यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्वप्रथम पोवाडा लिहिला. शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी फुलेंनी सन 1870 साली शिवजयंतीची सुरूवात केली. ती पहीली शिवजयंती होती. त्यानंतर शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांना एकत्र करण्याचे काम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. 20 व्या शतकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील शिवजयंती साजरी केली व दोन वेळा शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या थाटात शिवजयंतीला सुरूवात झाली.**

महाराष्ट्र सरकारने 2001 पासून शके 1551 ( शुक्रवार 19फेब्रुवारी 1630 ) ही शिवजयंतीची तारीख स्वीकारली त्यानुसार महाराष्ट्र सरकारने 19 फेब्रुवारी सार्वजनिक सुट्टी जाहिर केली. इतर संभाव्य तारखांमध्ये 6 एप्रिल 1627 ( वैशाख शुद्ध तृतीया ) ही जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या दिनदर्शिकामध्ये शिवजयंतीची वेगवेगळी तारीख दाखवीली आहे. महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसून त्यांचे कर्तुत्व, त्यांचा त्याग, रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे आहे. मी तर म्हणेल की शिवजयंती रोज साजरी व्हावी आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवा तयार होतील. कारण शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने आणि स्वाभिमानाने जगत आहो. गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे. शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते. तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात.19 फेब्रुवारी रोजी सुमारे 111 पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली जाते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते. कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते. शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास, तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे 7 घोडे होते. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे 400 गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वतः बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले.महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी केंद्र व राज्य सरकारला आग्र करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे. यातच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताची धरोहर व शान आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हापुन्हा जागृत होतील.गडकिल्ल्यांची सुरक्षा म्हणजे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल. कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांचे जतन करणे गरजेचे आहे. कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच. त्याचप्रमाणे त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती. 393 वर्षांनंतर आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर 4 हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते. हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे, असे सांगण्यात येते की वयाच्या 17 व्या वर्षी शिवरायांनी स्वतः डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते. आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले. अफझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून धाराशाही करण्याचे काम शिवरायांनी व त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले.हा देश साधुसंतांचा, थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे. याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो. देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, महागाई, शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची व सुख-समृध्दीची जबाबदारी स्वीकारावी. यातच खरे शिवजयंतीचे महत्त्व दिसून येईल.त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपन करायला हवे. यामुळे संपूर्ण गडकिल्ले सुशोभित होईल व जिकडे-तिकडे आपल्याला हिरवा गालीचा दिसून येईल. त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने प्रत्येक व्यक्तीने जर वृक्ष लागवड केली तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला शिवाजी महाराजांचे दर्शन अवश्य होईल व त्यांच्या आठवणी अनंत काळापर्यंत टिकून राहील.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

## ट्रॅक्टर तीस फूट खोल चुलबंद नदीपात्रात कोसळला

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** सावरगाव येथून कडधान्य घेऊन लाखांदूरकडे येत असलेला ट्रॅक्टर पुलावर अनियंत्रित होऊन थेट तीस फूट खोल चुलबंद नदीपात्रात कोसळला. या अपघातात एकाचा मृत्यू, तर दोघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना आज गुरुवारी घडली. अण्णा रामचंद्र पारधी (५०) असे मृताचे नाव असून, राधेश्याम ढोरे (२३) व राष्ट्रपाल ठाकरे (५०) हे गंभीर जखमी असून, तिघेही सावरगाव येथील रहिवासी आहेत. ट्रॅक्टर सावरगाववरून कडधान्य घेऊन लाखांदूर येथे येण्यासाठी निघाला असता लाखांदूर येथील चुलबंद नदीच्या पुलावर येताच मागून भरधाव वेगाने टिप्पर आल्याने चालकाचे नियंत्रण सुटले.






# धुळे जिल्ह्यात खाशाबा कुस्ती स्पर्धेचा आरंभ

## गरुड मैदान येथे अधिकाऱ्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्व. खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते शानदार उद्घाटन संपन्न करण्यात आले सुरुवातीला दीप प्रज्वलन करून जय मल्हार नाटकाचे फेम देवदत्त नागे व महाराष्ट्र ट्रिपल केसरी विजय चौधरी यांच्या यांच्या हस्ते कुस्तीची सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेत फ्री स्टाईल, ग्रीको रोमन, महिला संघ या तीन प्रकारात या स्पर्धा होतील. या तीन प्रकारच्या स्पर्धा दहा वजनी गटात होणार आहेत. या स्पर्धेसाठी राज्यभरातून ३० संघ आणि ६५० पेक्षा अधिक कुस्तीपटू, प्रशिक्षक सहभागी झाले आहेत. या स्पर्धेसाठी तीन मॅटचे आखाडे तयार करण्यात आले असून 10 हजार प्रेक्षकांसाठी गॅलरी उभारण्यात आली आहे. या स्पर्धेच्या यशस्वितेसाठी विविध समित्या गठित करण्यात आल्या आहेत. २५ फेब्रुवारी पर्यंत या स्पर्धा सुरू राहतील. याप्रसंगी जि.प अध्यक्षा अश्विनी पवार, महापौर प्रतिभा चौधरी, खासदार डॉ सुभाष भामरे, सिनेकलाकार देवदत्त नागे, ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी, जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बुवनेश्वरी एस., पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, सहाय्यक जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, धुळे महानगरपालिकेचे आयुक्त देवीदास टेकाळे, धुळे जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, क्रीडा विभागाच्या नाशिक विभागीय उपसंचालक सुनंदा पाटील, कोल्हापूर विभागाचे क्रीडा उपसंचालक संजय सबनीस, जिल्हा क्रीडाधिकारी आसाराम जाधव, प्रमुख स्पर्धा निरिक्षक संदिप भोंडवे, तांत्रिक समिती प्रमुख दिनेश गुंड, कुस्तीगीर परिषदेचे सदस्य उमेश चौधरी, उपमहापौर नागसेन बोरसे, सुनील चौधरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# पालकमंत्री साहेब आमच्या पीक विम्याचे पण बघा!

## शिवजयंती निमित्त पालकमंत्र्यांकडून खत व बियाण्याचे मोफत किट वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** मराठवाड्यासह जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे पावसाने जून ते ऑगस्ट महिन्यामध्ये बहुतांश ठिकाणी खंड दिला. तर काही ठिकाणी कमी प्रमाणात पाऊस पडला त्यानंतर सप्टेंबर ऑक्टोबरला परतीच्या पावसाने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान केले.

अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीनचे पिक पाण्यात गेले. काही शेतकऱ्यांचे उडीद मूग पीक पाण्यासोबत वाहून गेले. जनावरांच्या चारासाठी पेरणी केलेल्या खरीप ज्वारीसह भाजीपाल्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतकऱ्यांना पीक पंचनामे झाल्यानंतर त्यांचा हक्काचा पीक विमा मिळून देऊ शासनाकडून मदत देऊ असं अपेक्षाच गाजर सर्वांकडून देण्यात आलं. आज तीन महिने उलटली तरी शेतकऱ्यांना पावसामुळे नुकसानीची मदत आली ना त्याचा हक्काचा पिक विमा मिळाला. जिल्ह्यामधील शेतकऱ्यांना पिक विमा हा कमी अधिक प्रमाणात मिळाला असून एकच गावातील शेतकऱ्यांना किंवा एकाच गटा मध्ये शेती असलेल्या शेतकऱ्यांना पिक विमा हा खूपच कमी जास्त प्रमाणात वाटप करण्यात आला आहे. तुम्ही दिलेल्या पिक विमा हा कोणत्या निकषानुसार दिला गेला. लाखो शेतकऱ्यांचे करोड रुपये हडप करणाऱ्या विमा कंपनींना कोण जाब विचारणार..

याबाबत विमा कंपनीचे प्रतिनिधी मूग गिळून गप्पच आहेत. ही आमच्यासाठी खूप मोठी शोकांतिका आहे हे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग तीव्र नाराज असून आम्हाला तुमचं मोफत वाटप केलेले खत बियाणंचं किट पेक्षा आमच्या हक्काचाच विमाच मिळवून दिला असता तर बरं झालं असतं" असं म्हणत जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारलेल्या पालकमंत्री यांच्या बद्दल आपल्या तीव्र भावना व्यक्त केला आहेत. एन दिवाळीत परतीच्या पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यासाठी उपोषण करणारे लोकप्रतिनिधी, शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पिक विमा मिळावा म्हणून वारंवार न्यायालयाची उंबरे झिजवणारे लोकप्रतिनिधी, आपला जिल्हा हा अक्षांकित जिल्हा आहे म्हणून वारंवार जाणीव करून देणारे लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी जनता दरबार भरवणारे पालकमंत्री आपण सर्वजण शेतकऱ्यांसाठी कायम पुढे आहात तर मग शेतकऱ्यांचा पिक विमा दरवर्षी कुठल्या कागदाच्या चौकटीत अडकून पडतो याबाबत शेतकऱ्यांना नवल आहे.आपल्या जिल्ह्यामध्ये विकासाचा पाऊस तर तुम्ही पाडणारच आहात, पण गेल्या तीन वर्षापासून परतीच्या पावसाने आमच्या झालेल्या पिकाचे नुकसान आणि आम्ही पिक विमा भरून आम्ही संरक्षित केलेले पिक त्या नुकसान झालेल्या संरक्षित पिकाचे म्हणजे आमच्या हक्काचे पिक विम्याचे पैसे आम्हाला मिळून द्या. पिक विमा उतरवणाऱ्या कंपनीचा एक जनता दरबार भरवून शासनाकडून कोणत्या पिकाला किती विमा मंजूर झाला व कंपनीकडून किती दिला गेला. प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतातील पिकाची नुकसानीची माहिती ही त्या कंपनीने शेतकऱ्यांना भाग पाडावे. तेव्हाच हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे असेच मत जिल्ह्यातील शेतकरी वर्ग व्यक्त करत आहे. हाच सूर शेतकरी वर्गातून जोर धरू लागलेला आहे.



खरीप पिकाबद्दल सरकारने जाहीर केलेली पिक विम्याची टक्केवारी आणि प्रत्यक्ष भेटलेला पिक विमा या यात बरीच तफावत असल्याचं शेतकरी बोलून दाखवत आहेत . आमचं शेत,आमचं पीक संबंधित पीक विम्याचे रक्कम आमची आमच्या पिकाला कुठल्या निकषांनुसार पिक विमा दिला आहे . हे आम्हालाच अजून तरी ठाव नाही . हे बोचर कटू सत्य शेतकरी वर्गातून बोललं जात आहे . पिक विमा बाबत तक्रारीचा पाढा यावर्षीचा नाही तर गेल्या तीन वर्षापासून असंच चालत आलेल आहे . जिल्ह्यातील अनेक मंडळामधील खरीप पिक विमा भरलेल्या शेतकऱ्यांना पिक विमा भरली एवढी सुद्धा रक्कम मिळाली नाही . आज पर्यंत मिळत असलेली पिक विमा रक्कम किती ठिकाणी मंजूर झाली याबाबत शेतकऱ्यांमध्ये कायम संभ्रम अवस्था आहे . शेतकरी तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या पिक विमा कंपनी कार्यालयास चौकशीसाठी गेले असता शेतकऱ्यांना व्यवस्थित माहिती दिली जात नाही .

महाराष्ट्र Business Katta












# बॉलिवूडच्या निर्मात्यांची नजर दक्षिणेच्या हिट चित्रपटांवर







मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**बॉलीवूडचा बादशाह शाहरुख खानच्या पठाणनंतर 'शहजादा' कार्तिक आर्यनने बॉक्स ऑफिसवर आगमन केले. 'शहजादा' 6 कोटींची ओपनिंग केलेला यंदाचा पहिला रिमेकही चित्रपट आहे. कार्तिक आर्यन आणि क्रिती सेनॉनचा 'शेहजादा' हा अल्लू अर्जुनचा सुपरहिट चित्रपट 'अला वैकुंठप्रेमुलू'चा रिमेक आहे. रोहित धवनने या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाची ओपनिंग किंवा नंतरचा प्रेक्षकांचा प्रतिसादही फार कमी आहे. गतवर्षी दक्षिणेकडील 5 रिमेक चित्रपट आले.**

शाहिद कपूरचा 'जर्सी', अक्षय कुमारचा 'बच्चन पांडेय', अजय देवगणचा 'दृश्यम-2', ऋतिक रोशन चा विक्रम वेधा व शिल्पा शेट्टी आणि अभिमन्यू दासानी यांचा निकम्मा या प्रदर्शित झालेल्या चित्रपटांपैकी फक्त दृश्यम-2 हाच यशस्वी होऊ शकला. दुसरीकडे, यंदाही दक्षिणेतील 6 चित्रपटांचे अजय देवगणचा 'भोला', अक्षयचा 'सेल्फी' व 'सुराराई पोत्तरू', रणवीर सिंहचा 'अपरिचित', आदित्य रॉय कपूरचा 'गुमराह' व वरुण धवनचा 'सनकी' रिमेक येत आहेत. दुसरीकडे 'पठाण'ची विक्रमी घोडदौड 22 दिवसांत 500 कोटी क्लबमध्ये येऊन पठाण देशातील सर्वात वेगवान कमाई करणारा भारतीय चित्रपट बनला. यापूर्वी बाहुबली-2 हाच चित्रपट या क्लबमध्ये होता. मात्र त्याला 34 दिवस लागले होते. पठाणचे जागतिक कलेक्शन 976 कोटींवर गेले. गेल्यावर्षी तामिळ चित्रपट 'मास्टर' प्रदर्शित झाला होता आणि त्याने 250 कोटींपेक्षा अधिक व्यवसाय केला. रिलीज होताच करण जोहरसह बॉलिवूड निर्माते त्याचा हिंदीमध्ये रीमेक करण्यासाठी त्याच्या हक्कासाठी धावले. असे दक्षिणेमधील प्रत्येक चित्रपटाच्या बाबतीत घडत आहे. सध्या बॉलिवूड त्यांच्या रीमेकवरच चालला आहे. दक्षिणकडे हिट झालेल्या चित्रपटांचे रिमेक बॉलिवूड मध्ये येत असतात. तमिळचा हिट चित्रपट'

कॅथी' अजय देवगणला फार आवडला आहे. त्याने तो हिंदीतील त्याच्या रीमेकचा हक्क विकत घेतला आहे. जॉन अब्राहम मल्याळम चित्रपट 'अयप्पन काशीयम' लट्टू झाला आहे, त्याने त्याचे हिंदी हक्कही विकत घेतले असून त्याचा रिमेक बनवत आहे. 'भागमती' तमिळ आणि तेलगूमध्ये हिट झाल्यावर लगेच बॉलिवूड निर्मात्यांनी 'दुर्गावती' नावाने त्याचा रीमेक बनविला.बॉलिवूडचे बहुतेक निर्माते दक्षिणेच्या हिट चित्रपटांवर नजर ठेवून असतात. चित्रपट हिट होताच ते त्याचे हिंदी रिमेक हक्क विकत घेण्यासाठी पोहोचतात. कोरोनानंतर 2021 मध्ये 'मास्टर' हिट ठरल्याबरोबर लगेच बॉलिवूडच्या निर्मात्यांची त्याचे हक्क खरेदी करण्यासाठी स्पर्धाच सुरू झाली. निर्माता करण जोहरला हिंदीमध्ये 'मास्टर' बनवण्याचे हक्क विकत घ्यायचे होते, परंतु मुराद खेतानी यांनी ते आठ कोटींमध्ये विकत घेतले.

खेतानी यांनी यापूर्वी सोनी टीव्हीबरोबर 'मुबारका', टी सिरीजसोबत 'कबीर सिंह' चित्रपट बनवला आहे आणि टी सिरीजबरोबर 'भूलभुलैया 2' बनवला. तो हिटही झाला. 2017 मध्ये रिलीज झालेल्या 'विक्रम वेध' या तमिळ चित्रपटाच्या रीमेकमध्ये सैफ अली आणि ऋत्विकने काम केले. बोनी कपूर यांनी ''एफ2 फन एंड फस्ट्रेशन' या तेलगू चित्रपटाचे हक्क विकत घेतले आहेत. 2020 मध्ये रिलीज झालेला मल्याळम चित्रपट 'अयप्पनम कोश्याम'चे अधिकार जॉन अब्राहमकडे आहेत. साजिद नाडियादवाला 'आरएक्स 100' या तेलगू चित्रपटाचा रीमेक 'तडप' नावाने आला. या चित्रपटातून सुनील शेट्टीचा मुलगा आयान प्रथमच बॉलीवूडमध्ये प्रवेश केला आहे. तमिळ थ्रिलर 'कॅथी' वर अजय देवगणला हिंदी चित्रपट बनवायचा आहे आणि रीमेक हक्कही खरेदी केले गेले आहेत. शाहिद कपूरसमवेत करण

जोहरने हिंदीमध्ये 'डियर कॉम्रेड' तेलगू चित्रपट बनवण्याचे हक्क विकत घेतले आहेत. एकंदरीत बॉलिवूडचा प्रत्येक हिट निर्माता दक्षिण भारतातील हिट चित्रपटांकडे डोळे ठेवून आहे. बॉलिवूड दक्षिण भारतातील हिट चित्रपटाच्या रीमेकचे अनुकरण करत आहे.

गेल्यावर्षी आलेला शहीद कपूरचा 'जर्सी' नावाचा चित्रपट 2019 मध्ये रिलीज झालेला याच नावाच्या तेलुगू चित्रपटाचा रिमेक होता. अक्षय कुमारचा 'बच्चन पांडे' हा चित्रपट अजित अभिनित तमिळ चित्रपट 'वीरम'चा रिमेक आहे. तसेच गेल्या वर्षी रिलीज झालेल्या 'अंजाम पॅथीरा' या मल्याळम चित्रपटाच्या रिमेकमध्ये सलमान खान काम करणार असल्याच्या बातम्या आहेत. तेलुगू चित्रपट 'वैकुंठापुरमुल्लो' च्या रीमेकमध्ये म्हणजे शहजादामध्ये कार्तिक आर्यन मुख्य भूमिका

साकारली आहे. इशान खट्टर आणि अनन्या पांडे 'टॅक्सीवाला'च्या रिमेकमध्ये आहेत. सनी देओलचा मुलगा करण देओलदेखील साऊथच्या हिट चित्रपटाच्या रीमेकवर काम करत आहे. सलमान खानचा चित्रपट 'किसी का भाई किसी का जान' हादेखील तेलुगू चित्रपटाचा रिमेक असून यात चार भावांची कथा आहे. या चित्रपटाची नायिका पूजा हेगडे आहे. 1989 च्या 'रामोजीराव स्पीकिंग' या मल्याळम चित्रपटावर तयार झालेल्या 'हेराफेरी'ने अक्षय कुमारची कारकीर्द उज्ज्वल केली. अजय देवगणच्या तमिळ चित्रपटाच्या 'सिंघम' हिंदी रिमेकनेही हीच गोष्ट केली होती. 'वॉन्टेड' आणि 'बॉडीगार्ड' या चित्रपटाच्या यशाने सलमान खानला मोठे बळ मिळाले. तेलगू चित्रपट 'टेम्पर' वर आधारित रणवीर सिंगच्या 'सिम्बा' ने बॉक्स ऑफिसवर चारशे कोटींपेक्षा अधिकचा व्यवसाय केला. 60 कोटींमध्ये बनलेल्या आमिर खानच्या 'गजनी' ने 250 कोटींपेक्षा जास्त कमाई केली. बहुतेक रीमेक हिंदी चित्रपट हिट झाले आहेत. हिंदी चित्रपट निर्माते आणि अभिनेते हे दोघेही दक्षिणेच्या हिट चित्रपटांवर बनलेल्या रिमेकला अधिक प्राधान्य देताना दिसत आहेत. कारण तेथे धोका कमी आहे. यामुळेच बॉलिवूडमधील रिमेक चित्रपटांचा बॉलिवूडमध्ये दबदबा वाढत आहे.

# कीर्तनातून वर्तन सुधारणारे संत गाडगेबाबा



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत हा संत महापुरुषांची भुमी आहे असे मानले जाते कारण जगाच्या पाठीवर एवढे संत महापुरुष आपल्या देशात निर्माण झालेले आहेत आणि त्यांचे कारण म्हणजे आपल्या देशात अंधश्रद्धा, पाखंड, विषमता, स्पृश्य अस्पृश्यता, जातीवादाला प्राधान्य देऊन मानसाला हक्क अधिकारांपासुन दुर ठेऊन त्यांचा कोणत्याही प्रकारचा विकास जाणीव पुर्वक होऊ दिला जात नव्हता. माणसाला माणुस म्हणून जवळ बसता येत नव्हते, तर एकमेकांना सोबतचे खाने पिने तर दुरच. आणि याच व्यवस्थेवर वार करण्यासाठी व मानसाला माणसाचा सन्मान मिळावा यासाठी येथे अनेक थोर महापुरुष, संत होऊन गेले.**

जर विषमता जातीवाद स्पृश्य अस्पृश्यता पाखंड अंधश्रद्धा समाजात एकाच वर्गाकडून पाळली गेली नसती तर कदाचित देशात महापुरुष व संत निर्माण झालेच नसते. म्हणून अशा महापुरुष व संताचे जंयती आणि स्मृतिदिन साजरे करताना आपल्याला त्यांनी केलेल्या कार्यावर भाष्य करणे आवश्यक असते. फक्त फोटोला हार घालून जयंती साजरी होत नाही नाही तर त्यांनी समजासाठी जे काही केले ते कार्य व आजची परिस्थिती यावर विचार विनीमय व चिकित्सा करणे आवश्यक असते. संत महापुरुषांचे दिन साजरे करताना किंवा अभिवादन करताना त्यांनी केलेले कार्य ऐकून जर कोणाच्या मनाला ठेच पोहचत असेल तर याचा अर्थ अजूनही ते विषमता जातीभेद अंधश्रद्धा पांखड याचे समर्थन करतात व संत आणि महापुरुष यांना वैचारिक विरोध करतात. दुसरी अजून एक महत्वाची गोष्ट म्हणजे ज्यांनी कधीच पुस्तके वाचली नाहीत त्यांनी तर कधीच महापुरुष आणि आणि संतावर बोलू नये. संत गाडगेबाबा यांच्या बाबतीत बोलायच झाले तर गाडगेबाबा हे शिकलेले नव्हते परंतु त्यांनी देशाला शिकवले. देशाला समता बंधुता प्रेम व सत्कर्माचा मार्ग दाखवला आहे. आणि हे करताना मात्र अंधश्रद्धा, पाखंड, विषमता, भेदभाव, कर्मकांड यावर प्रबोधन करून समाजाला जागृत केले. व शिक्षणाचा संदेश आपल्या किर्तनामधुन संत गाडगेबाबा यांनी दिला. संत गाडगेबाबा अडाणी असुनही आज आम्हाला वंदनीय का आहेत तर गाडगेबाबा यांनी समाजासाठी जेक काही केले ते निस्वार्थ भावनेने व लोक कल्याणासाठी केले. अडाणी असले तरीही भल्याभल्यांना लाजवेल अशी कामे त्यांनी केली. वेगवेगळ्या ठिकाणी धर्मशाळा बांधून लोकांना आश्रय निर्माण करून दिला. धर्मशाळेमध्ये भोजन व निवास व्यवस्था करून दिली आणि सर्वात महत्वाचे म्हणजे धर्मशाळेची जबाबदारी देताना ते खुप विचार करत होते. सर्वांसाठी जेवन एकच असले पाहिजे, धर्मशाळा सांभाळणारे वा तेथे काम करणारे इमानदार असले पाहिजे, ते व्यसनी नसावे, त्यांचे नातेवाईक नेहमी धर्मशाळेत येता कामा नये. एखाद्या वेळी आलेच तर फक्त एका वेळची जेवनाची सोय तेथे होईल बाकी त्यांना त्यांची सोय बाहेर करावी लागेल. आजचा विचार केला तर याउलट परिस्थिती आहे राजकीय लोकांचे काम गाडगेबाबा यांच्या विचाराविरोधात आहेत. आणि विषेश गाडगेबाबा यांनी लोकवर्गणीतून एवढ्या धर्मशाळा बांधल्या परंतु त्याचा एकही रुपया स्वतः साठी खर्च केला नाही ही आजच्या व्यवस्थेला भ्रष्ट सरकारला चपराक आहे.


***कोटीच्या धर्मशाळा। बांधल्या लोकांसाठी।***
***झोपडी नशिबी नाही। कुंताबाईच्या।***
***काढीले अन्नछत्र।भुकेले होती तृप्त।***
***वाट्याला माझ्या।नाही अन्नशित।***

लोकांच्या पोटापाण्याचा आणि राहण्याची सोय करून देणाऱ्या गाडगेबाबा यांच्या पत्नीला मात्र गरीबीतच जिवन जगावे लागले कारण गाडगेबाबा करोडो रुपयाच्या धर्मशाळा व अन्नछत्र बांधत

***देव देव करता शिनले माझे मन***
***पाणी आणि पाशान जिथे तिथे***

दगडा मध्ये वा तिर्थामध्ये देव नसतो तिथे तर फक्त पाणी आणि दगड असतात. देव बघायाचा असेल माणसात बघा आणि त्याची सेवा करा अशा उपदेश गाडगेबाबा करत होते. परंतु हा उपदेश आजही काही लोकांच्या जिव्हारी लागतो कारण लोकांची दिशाभुल करून लोकांचे पैसे हडपण्याचे कार्य आजच्या

देवभोळ्या समाजाला विज्ञानवादी बनवण्यासाठी गाडगेबाबा यांचे किर्तन होते आजचे काही बहाद्दर तर विज्ञानातच अध्यात्म शोधतात आणि लोकांना दैववादी बनवतात. संत गाडगेबाबा अंगारा धुप देऊन दुख दुरणारे महाराज नव्हते तर समाजील अंगारा आणि अंधश्रद्धेचा धुप कायम घालणारे संत होते. आणि हे सर्व शक्य होते फक्त शिक्षणाने म्हणून ते शिक्षणाचे महत्व आपल्या किर्तनातुन लोकांना



असले तरी तो पैसा लोकांचा आहे म्हणून वैयक्तिक खर्च करणार नाही एवढे प्रामाणिक व समाजाप्रती संवेदनशील गाडगेबाबा होते. आजचे लोक तर लोकांच्या पैशावर अगोदर स्वतः चे घर भरतात बेईमानी करतात स्वतः ला महाराज समजणारे लोक गोरगरीब लोकांकडून पैसा उकळून स्वतः चे घर भरतात व समजामध्ये अंधश्रद्धा पसरवतात. गाडगेबाबा यांनी अंधश्रद्धा व कर्मकांड यावर समजात भरपूर प्रबोधन करून समाजाचे विज्ञानवादी वर्तन बनवण्याचा प्रयत्न केला. तिर्थ कर्मकांड हे पैशाचा नाश करणारे आहेत, ते पोटभरण्याचे साधने आहेत. देवाच्या नावाखाली लोकांची होणारी आर्थिक व मानसिक पिळवणूक यामुळे गाडगेबाबा यांचे मन उदास होत होते. म्हणून गाडगेबाबा म्हणायचे

स्वयंघोषित महाराजांकडून तर लोकांचे हक्काचे पैसे हडपण्याचे काम राजकीय नेत्यांकडून केले जात आहे. आजही लोकांना दगडातील देवासाठी भक्ती करायला लावली जात आहे आणि मंदीराबाहेर असलेल्या भिकाऱ्यांची संख्या मात्र वाढत आहे. हिच खरी शोकांतिका आहे.

गाडगेबाबा देव, कर्मकांड व सत्यनारायण हे थोतांड व पोटभरण्याचे साधन आहेत हे गाडगेबाबा लोकांना समजले अशा भाषेत नाट्यमय स्वरुपात सांगायचे. सत्यनारायण आणि पोथीमुळे कोणाचे भले होऊ शकत नाहीत हे अनेक उदाहरणे देऊन सांगत. देऊन बांधले की देवळात देव आणावा लागतो आणि तोही विकत? तेव्हा ते म्हणायचे देव बाजाराचा भाजीपाला नाही जो विकत भेटते.

सांगत वेगवेगळी व सत्य उदाहरणे देऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत. शिक्षणाचे उदाहरण पटवून देताना आणि लोकांना समजेल असे एकमेव उदाहरण म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर होत. शिक्षणामुळे माणुस दिल्लीला जाऊ शाऊ शकते, शिक्षणामुळे कुळाचा उद्धार होऊ शकते असे ते किर्तनामधुन सांगत. डॉ बाबासाहेब आंबेडकर शिकले म्हणून त्यांनी देशाची घटना लिहली, जर ते शिकलेच नसते तर घटना लिहु शकले नसते म्हणून परिस्थिती ला आड आणुन मुलांना शिक्षणापासून दुर ठेऊ नका अंगावर लुगड कमी भावाच घाला, भाकरी हातावर घेऊन खा पण मुलांना शाळा शिकवा ही शिकवण म्हणजे आजही समाजाला दिशा देणारी आहे. शिक्षणासाठी गरीबाच्या मुलांना मदत करण्याचे

आवाहन ते करत असत. कोणाला चड्डी द्या, कोणाला पेन वही द्या, गरिबाच्या लेकरालाही शिकण्याची संधी द्या म्हणजे लहान लेकरं रस्त्यावर फिरताना, रस्त्यावर कचऱ्यासारखी दिसणार नाहीत. म्हणून ते म्हणायचे...

***जयाचे मनी लालसा शिक्षणाची***
***गरिबी मुळे होतसे हाय त्याची***
***अशा इच्छिती लाऊन हातभार***
***करा हे श्रेष्ठ दान सर्वात थोर***

शिक्षणाला मदत करणे हे सर्वश्रेष्ठ दान आहे असे गाडगेबाबा माणत होते. अस्पृश्यता निवारण्याचे सुद्धां त्यांनी काम केले. माणसा माणसामध्ये भेद न करता माणूस म्हणून जगण्याचा संदेश ते नाट्यमय पद्धतीने सांगत होते. गाडगेबाबा हे किर्तना दरम्यान प्रश्न करायचे ते प्रश्न एवढे तार्किक असायचे की लोक भारावून जायचे. अंधश्रद्धा आणि त्यातून निर्माण झालेले नवस व त्याच्या आडून होणारी लुट यावर गाडगेबाबा नेहमी भाष्य करून लोकांच्या डोक्यात प्रकाश टाकायचे.

***मुक्यातही जीव। अंधद्धेचा असुर।***
***दुर सारतो केर। डेबुजी***

अंधश्रद्धेच्या पोटी मुक्या प्राण्याचा जिव घेऊ नाही. अंधश्रद्धा ही खुप घातक आहे आणि ही अंधश्रद्धा दुर करायची असेल तर डोक्यातील कचरा बाजूला सारावा लागेल आणि तेच काम गाडगेबाबा करत असत. गाडगेबाबा यांचए जिवन म्हणजे मेहनत, प्रामाणिकपणा विज्ञानवाद होय. गरिब असुनही कधी लाचार होऊन तडजोड करून स्वतः चे घर भरण्याचा विचार कधीच डोक्यात आला नाही. करोडो रुपये लोकांनी धर्मशाळेसाठी दिले परंतु दोन पैसे स्वतः खर्च करून बायकोला पक्के घरही बांधुन दिले नाही. व्यभिचारी व अनैतिक लोकांना त्यांनी कधीच जवळ केले नाही. गोरगरीब लोकांची सेवा करून त्यांच्या मध्ये देव व मानवता धर्म समजून त्यांची सेवा केली. पंढरपूर येथे बांधलेली धर्मशाळा बांधून झाल्यानंतर ती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे सुपूर्द करून दिली होती. गोरगरीब लोकांना जागृत करण्याचा त्यांनी विडाच उचलला होता. एके ठिकाणी किर्तन सुरू असताना पुत्राचा मृत्यू झाल्याची वार्ता येते. क्षणभर थांबतात विचार करतात आणि पुन्हा किर्तनाला सुरवात करता..

***ऐसे रोजच मरतात कोट्यानकोटी***
***कुठे रडू मी एकासाठी***

गोरगरीब समाजाला आपला परिवार समजून त्यांना अंधश्रद्धेमधुन बाहेर काढण्याचा प्रयत्न गाडगेबाबा यांनी शेवट पर्यंत सोडला नाही. म्हणून ते आजही संत गाडगेबाबा वंदनीय व आदरनीय आहेत.

# महान कर्मयोगी संत गाडगे महाराज




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील थोर संत, कीर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे.**

१८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेल हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खरट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.



समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या पप्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवरूषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला.

# भाऊबंदकीची 'ग्रामीण' गोष्ट



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**आपल्या मराठी साहित्य संस्कृतीला ग्रामीण साहित्याचा फार समृद्ध असा वारसा लाभला आहे. भरत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ' ही महाकादंबरीही तोच वारसा पुढे नेणारी. कथेचा भौगोलिक संदर्भ, सांस्कृतिक पार्श्वभूमी ही या कादंबरीची अत्यंत प्रबळ बाजू आहे. मराठवाड्यातील अस्सल ग्रामीण भाषेतले शब्द आणि लहेजा सांभाळत लेखक आपल्यापुढे एका खेडेगावाचं चित्र उभं करतो. व्यवसायाने गावकरी पिढीजात शेतकरी आहेत. गाव कसं असेल, तिथली लोकं कशी आहेत ह्याचा प्रत्यय आपल्याला पहिल्या दोन पानातच येतो. गावात ज्या गोष्टी अनपेक्षितपणे घडतात त्याचा लोकांना सहाजिकच धक्का बसतो आणि गावकरी मग सारखी त्याचीच चर्चा करू लागतात.**

अगदी गावातलं एखादं झाड जरी पडलं किंवा नदीला पूर जरी आला तरी त्यावर चर्चा करणारं गाव आपल्या पुढे उभं रहातं. ह्याच पार्श्वभूमीवर लेखक आपल्याला काशिनाथ आणि विश्वनाथ ह्या दोघा भावांची ओळख करून देतो आणि कथा झरझर पुढे सरकू लागते.

द्वारकाबाईच्या कुटुंबातील भाऊबंदकीची ही प्रातिनिधिक कहाणी. द्वारकाबाईंनी पतीच्या पश्चात आपल्या विश्वनाथ आणि काशिनाथ या दोन मुलांना मोठे करून त्यांची लग्ने लावून दिली आहेत. पिढीजात मालकीची शेतजमीन बऱ्यापैकी. दोन्ही भावांना आधुनिक शिक्षणाचा गंध नाही. काशिनाथ हे गावातलं मोठं आणि सन्माननीय प्रस्थ आहे. गावातल्या लोकांमध्ये त्याचा आदर आणि प्रचंड दरारा आहे. गावातल्या प्रत्येक निर्णयात ज्याच्या शब्दाला मान आहे, प्रत्येक शुभाशुभ प्रसंगी ज्याचा सहभाग आहे, असा काशिनाथ लग्न झालं असूनही एका परस्त्रीच्या (चंद्रीच्या) मागे लागतो आणि गावात चर्चेला तोंड फुटतं. काशिनाथच्या तोंडावर हे सगळं बोलण्याची कुणाची हिंमत नसल्याने त्याचा त्रास विश्वनाथला सहन करावा लागतो. त्यावरुन काशिनाथ आणि विश्वनाथ एकमेकांसमोर उभे ठाकतात आणि भाऊबंदकीची सुरवात होते. त्यांची आई द्वारकाबाईही त्यातून ह्या दोघांना सावरु शकत नाही.

आईचा आपल्या सर्व लेकरांवर एकसारखा जीव असतो. परंतु पक्षपातीपणाच्या आरोपाची वेदना प्रत्येक आईच्या वाट्याला येते आणि द्वारकाबाईही त्यातून सुटलेल्या नाहीत. भाऊबंदकी आणि संकुचित दृष्टीने ग्रासलेल्या द्वारकाबाईच्या कुटुंबात दोन्ही जावा आपापल्या शैलीने कौटुंबिक स्वास्थ्याला तडे देण्यामध्ये व विभक्त होण्यासाठी नवऱ्यांना चेतवण्यामध्ये कृतकृत्यता मानणाऱ्या दिसतात. द्वारकाबाई वयस्कच नव्हे, तर जगाचे सजग भान असलेल्या परंतु सुनांपुढे हतबल ठरत चाललेल्या चितारत्या आहेत. संपूर्ण कादंबरीवर द्वारकाबाईंचे व्यक्तिमत्त्व 'जिवंत' सावलीसारखे छाया करते. ऋतू बदलाप्रमाणे व वयोमानाप्रमाणे कुटुंब आणि घर ,आपल्याच रक्तामाणसाची माणसं यांच्यावरची संपत जाणारी पकड माणसाला किती क्लेशकारक आणि उन्मळून टाकणारी असते हे दाखवण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

सर्वसामान्य ग्रामीण शेतकरी जमीन जुमला असलेल्या सधन कुटुंबातील दोन भावांची हि कथा नकळत वैश्विक व आपल्या सर्वांची होऊन जाते. कुठल्याही मोहाला बळी पडतांना कुटुंब, समाज आणि अनेक गोष्टी आपल्या पावलावर पाऊल टाकून मागोमाग येत असतात. आपल्या सैरभैर वागण्याचे भयंकर परिणाम पुढे आपल्यावर अवलंबून असलेल्या आपल्याच आप्त स्वकियांवर कसे होतात याचे यथार्थ चित्रण हि कथा करते. सत्तापिपासू वृत्ती आणि अहंकाराच्या चक्रीवादळात सापडलेली अनेक कुटुंब आपण पहातो आणि त्यामुळे ही कथा आपल्याला आपल्या जवळची वाटते. शेतीमातीच्या, चुलते भावकीच्या वातावरणात वाढलेल्या प्रत्येक वाचकाला ती भावुक करुन जाते.

कादंबरीमध्ये येणाऱ्या विविध व्यक्तिरेखा मधून कादंबरीचा आशय उलगडत जातो. प्रत्येक व्यक्तिरेखा ही तिच्या काही ना काही वैशिष्ट्यामुळे वेगळी भासते आणि आपला ठसा उमटवून जाते. भाऊबंदकीतून तरारणारी वांझोटी स्पर्धा, केविलवाणी ईर्षा आणि कूपमंडूकी असूया यांचे प्रमाणशील, वास्तवदर्शी चित्रण यांनी ही कादंबरी समृद्ध झाली आहे.


भारत काळे हे काळाचा वेध घेऊन लेखन करणारे कादंबरीकार आहेत. त्यांनी केलेली मानसशास्त्रीय अंगाची मांडणी ही त्यांच्यातल्या वेगळेपणाची ओळख करून देणारी आहे. त्यांनी मानवी मनाचे अनेक धागे वाचकांच्या समोर आपल्या साहित्यातून मांडले आहेत.मानवी मनाचे बदलत जाणारे कंगोरे...स्त्रीसुलभ कृती...बालमनांचे कवडसे आणि वृद्धांचे शरीर मनाने झुरत झिजत जाणे असे अनेक बारकावे लेखकाने सुंदररित्या मांडले आहेत.

काळेंच्या कादंबरीत स्वप्नाळू ध्येयवादाची कृत्रिम लकाकी तर नाहीच, पण निम्नस्तरीय सौंदर्यवादाचे हव्यासी सावटसुद्धा तिला ग्रासत नाही. या महाकादंबरीच्या शोकांताकडे प्रथमपासून झालेल्या आशयपूर्ण अपरिहार्य वाटचालीमध्ये वाचक गुंतत जातो. ४८४ पानांच्या या दीर्घ कादंबरीने ललित साहित्यप्रेमी चोखंदळ वाचकांच्या श्री. काळेंबद्दलच्या अपेक्षा नक्कीच बळावल्या आहेत. बऱ्याच दृष्टिकोनातून तिचे अप्रूप रसिक मनाचा वेध घेते. पुस्तकाच्या मलपृष्ठावरील अभंग आपलं लक्ष वेधून घेतो.

अभंगाच्या ओळी कथेला अगदी समर्पक अशा आहेत. त्यावरुन कादंबरीची कथा काय असेल ह्याची पुसटशी कल्पना आपल्याला येते. आपल्या पोरांची मने सांधण्यात अयशस्वी ठरलेल्या द्वारकाबाईंसारख्या अनेक हतबल मातांना ही कादंबरी लेखकाने समर्पीत केली आहे आणि ती किती सार्थ आहे हे कादंबरी वाचताना क्षणोक्षणी जाणवते.

एकूणच 'ऐसे कुणबी भूपाळ' हि कादंबरी नसून स्वार्थीपणामुळे झालेल्या पडझडीचा, वाताहतीचा जणू एक चित्रपट आहे असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. ही दिर्घ कादंबरी प्रत्येक ग्रामीण वाचकाच्या संग्रहात राहिल यात शंकाच नाही.

**कादंबरी: ऐसे कुणबी भुपाळ**
**लेखक: भारत काळे**
**प्रकाशक: देशमख आणि कंपनी पब्लिकेशन**




# नटण्यावर प्रश्नचिन्हं नसावं



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**अलीकडे महिला जास्त साजश्रृंगार करतांना आढळतात. याचा अर्थ असा नाही की पुर्वी साजश्रृंगार नव्हता. पुर्वीही साजश्रृंगार होता. पुर्वी महिला साजश्रृंगार करतांना अति प्रमाणात साजश्रृंगार करीत नसत. परंतू त्या साजश्रृंगार करीत. तसाच साजश्रृंगार पुरुषही करीत. परंतू काळ बदलला व बदलत्या काळानुसार पुरुषांनी नटणेपणा सोडला. महिलांनी तो सोडलेला नाही.**

पूर्वीचा या साजश्रृंगाराबाबतचा इतिहास जर पाहिला तर या इतिहासात अश्मयुगाचं वर्णन हिरीरीनं करावं लागेल. अश्मयुगात ज्यावेळी माणूस झाडावरुन जमिनीवर आला, तेव्हा माणसं अलंकार म्हणून दगडाचा वापर करीत असत. त्यावेळी ते दगडापासून छोटे छोटे मणी बनवत असत. त्यानंतरचा काळ म्हणजे नवाश्मयुग. या काळात माणसानं हाडाचे अलंकार बनवले होते. त्याच काळात विशेषतः महिला वर्ग अंगाला उटणं देखील लावत असत. व्यक्तीच्या नटण्याची परंपरा ही प्राचीन आहे. या परंपरेत पुर्वी माणसंही नटत होती. या नटण्यात पुर्वी मोरपीस किंवा प्राण्यांची पिसं डोक्यावर लावणे, शंखशिंपल्यांच्या माळा वनवून डोक्याला लावणे, हाडांचे व कातडीचे अलंकार वापरणे इत्यादी गोष्टींचा समावेश असे. कालचे राजेमहाराजे पाहता आजही ते महाराजे वेगवेगळ्या रंगाच्या माळा घातलेल्या दिसतात. हे राजे एखाद्या दासीनं वा गुलामानं चांगली आनंदाची बातमी सांगीतल्यास त्याला बक्षीस म्हणून आपल्या गळ्यातील माळ काढून देत. म्हणून त्यांच्या नटण्याला मान्यता होती. तशा राण्याही नटत होत्या. तसं पाहता आजही आदिवासी समुदायात लोकं वेगवेगळ्या रंगभुषेने नटत असतात.



आज मात्र नटण्याची स्पर्धा लागली आहे. आज पुरुष हा जास्त करुन नटत नाही. जास्त नटते ती महिला. पुरुष एखाद्या उत्सवप्रसंगी चांगले कपडे परीधान करतो. एखाद्या वेळी पावडर लावतो. कधी उटणेही. परंतू महिला ? आज महिलाच जास्त प्रमाणात नटतांना दिसते. तिच्या नटण्याला लोकं पती असलेल्या पुरुषांच्या आयुष्याची कामना समजतात. आज अगदी जी गरीबही स्त्री असेल. तिलाही नटणं आवडते. या नटण्याच्या बाबत विचार करतांना विशेष गोष्ट अशी की काही लोकं नटण्यासाठी कर्जही काढतात असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. परंतू त्यावर मत देतांना लोकं म्हणतील की असे प्रकार उघडकीसच आले नाही. मग लेखक महोदय असे कसे बोलतात. परंतू हे खरे आहे. कारण आज काही काही स्त्रिया ह्या अलंकार आधी बनवून घेतांना दिसतात व त्यानंतर त्या अलंकाराचे पैसे हप्तेवारी देत असतात. काही काही स्त्रिया, ह्या स्त्रियांवर कर्ज असतं लोकांचं, तरीही त्या नटत असतात.

नटणं हे स्त्रिच्या सौभाग्याचं लक्षण आहे. नटणं या प्रकारात केवळ सौभाग्यवतीच स्त्रिया मोडत नाही तर अगदी जन्म झालेल्या बाळापासून तर आज मरणाला खिळलेल्या अगदी म्हाता-या जराजर्जर झालेल्या महिलांचाही समावेश होतो. काही नटींच्या सौंदर्यात फरक पडल्यानं त्यांनी आत्महत्या केल्याचं दिसत आहे. काही महिलांना वयानुरुप येणारे काळे दाग चालत नाहीत. ते घालविण्यासाठी अगदी महागड्या क्रीम लावत असतात. तरीही ते काळे दाग जात नसल्यानं आज अशाच चिंताग्रस्त झालेल्या ब-याच महिला दिसतात. त्यांच्या चिंताग्रस्त असल्यानं आणखी जासूत सौंदर्य बिघडत असतं. याबाबत विशेष सांगायचं म्हणजे नटणं हा आपला अधिकार आहे. नटा, नटण्याला मनाई नाही. परंतू कोणीही नटण्यासाठी कर्ज काढू नये वा पतीच्यामागं सतत नटण्यासाठी तगादा लावू नये. उदाहरण द्यायचं झाल्यास आज काही काही अशा स्त्रिया दिसतात की बाजूची बाई जर दोन हजाराची साडी वापरत असेल तर तिही तेवढ्याच पैशाची साडी घेवून मागते. घेवून न दिल्यास निराश होते. यामध्ये विचार असा आहे की जेवढी आपली ऐपत, तसं स्त्रियांनी वागायला हवं. बाजूच्या स्त्रिची जर चंद्रावर जायची ऐपत असेल आणि आपली नसेल तर आपण चंद्रावर जायची तयारी करु नये. तसंच अशा नटण्यासाठी पतीनं नकार दिल्यास स्वतः आत्महत्या करु नये किंवा आपल्या पतीला आत्महत्या करायला लावू नये.

महत्वाचं सांगायचं म्हणजे आज महिलांनीच का नटावं ? त्यांनीच नटण्याचा ठेका घेतला आहे काय ? त्याच्या नटण्याचा पुरुषांच्या आयुष्य वाढविण्याशी कोणता संबंध ? तरीही स्त्रियांनी नटावं यासाठी मध्यंतरीच्या काळापासूनच त्यांच्या नटण्यासाठी प्रथा पाडून ठेवल्या. तिला सोळा श्रृंगारांची देवी मानल्या गेलं. पुरुषांचं नटणं हळूहळू बंद केलं गेलं. या नटण्याबद्दलची समानताही हळूहळू नष्ट केली गेली. आता नटण्याची सवय पडली असल्यानं जर एखाद्या उत्सवप्रसंगी महिला नटली नाही वा तिनं कोणत्याही स्वरुपाचा साजश्रृंगार केला नाही तर तिला बरं वाटत नाही. त्याही पुढे जावून तिच्यावर प्रश्नचिन्हं उभे राहतात. नावबोटं ठेवली जातात. म्हणून नाईलाजानं का होईना परंपरा आहे म्हणून स्त्रिया नटतात. मग कोणताही प्रसंग का असेना, आजही काही काही समाजात महिलांना मरणातही नटविण्याची परंपरा आहे. पुरुषांना नाही.

आज स्पर्धेचा काळ आहे. या स्पर्धेच्या काळात लोकांच्या नटण्याची जणू स्पर्धा लागलेली आहे. आज कोणी जर नटला नाही तर त्याला गरीब समजलं जातं. त्याच्यावर ताशेरे ओढले जातात व त्याचा पदोपदी अपमान समजला जातो. म्हणून कोणीही या नटण्यावर विशेषतः भर देवू नये. कोणी नटत नसेल तर त्याला नावबोटं ठेवू नये. तसाच आपल्या पाहण्याचा दृष्टीकोणही बदलावा. जेणेकरुन त्या व्यक्तीला वैषम्य वाटणार नाही. त्याला स्वतःचा अपमान झाला असंही वाटणार नाही. तसेच तो व्यक्ती कधीही आत्महत्या करणार नाही वा कोणाला करायला लावणार नाही. विशेषतः नटण्यावर प्रश्नचिन्हं नसावं म्हणजे झालं.


# शेतकरी आत्महत्यांची उपेक्षा; किसानपुत्रात तीव्र असंतोष

## १९ मार्चला राज्यभर होणार उपोषण : अमर हबीब

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** येत्या 19 मार्च रोजी महाराष्ट्रभर अन्नत्याग उपवास केला जाणार आहे, अशी माहिती किसानपुत्र आंदोलनाचे अमर हबीब यांनी दिली. सत्ताधारी क्रूरपणे, विरोधीपक्ष बेजबाबदारपणे व मीडिया गाफीलपणे शेतकरी आत्महत्यांची उपेक्षा करीत आहेत. याबद्दल किसानपुत्रांमध्ये रोष आहे, असे त्यांनी सांगितले. 21 फेब्रुवारी झालेल्या आढावा बैठकी नंतर अमर हबीब म्हणाले की, गडचिरोली पासून कोकणा पर्यंतचे प्रतिनिधीनी ते काय तयारी करीत आहेत या बाबत माहिती दिली. पुण्यात किसानपुत्र बालगंधर्व जवळ उपोषणाला बसतील त्या नंतर संध्याकाळी एसेम फौंडेशन येथे 'कोरडी शेती ओले डोळे' या पुस्तकावर आंतरभारतीच्या वतीने परिसंवाद होईल असे मयूर बागुल यांनी सांगितले. नितीन राठोड, विश्वास सूर्यवंशी, आदी सहकार्य करणार आहेत. आंबाजोगाईत पत्रकार उपोषणाला बसणार आहेत असे सांगून अनिकेत डिघोळकर म्हणाले की, सुदर्शन रापतवार यांच्या मार्गदर्शना खाली संध्याकाळी वसंत मुंडे यांचे व्याख्यान असयोजित केले आहे. शैलजा बरुरे यांनी स्वाराती महाविद्यालयातील विद्यार्थी मिरवणुकीने व्याख्यान स्थळी येतील असे सांगितले. शहरातील विविध संघटना सहकार्य करीत आहेत. परतुर (जालना) च्या नवनाथ तनपुरे यांनी गावोगाव भोगा लावून 19 ला उपवास करण्याचे आवाहन करीत आहोत असे सांगितले तर ऐश्वर्या तनपुरे शेतकरी आत्महत्यांवर स्ट्रीट प्ले करणार आहे. अकोट (अकोला) येथे यंदा मोठ्या प्रमाणात उपवासाची तयारी करीत आहोत असे मुकेश टापरे यांनी सांगितले. देगलूरचे नरसिंग देशमुख, नांदेडचे प्रा डॉ विकास सुकाळे, डॉ. हरीश नातू पदयात्रेत सहभागी होतील. औरंगाबादचे भूषण पाटील यांनी 4 तारखेला बैठक बोलावली असल्याचे सांगितले. संदीप धावडे यांनी वर्ध्याच्या उपोषणाच्या तयारीची माहिती दिली. रामकिसन रुद्राक्ष, डांगे (जवळा बाजार) अनंत देशपांडे (लातूर) यांनीही मार्गदर्शन केले.

पदयात्रा डॉ राजीव बसर्गेकर यांनी किनगाव (जळगाव) ते धुळे या मार्गावर निघणार्या पदयात्रे बद्दल माहिती दिली. हृतगंधा पाटील व संदीप धावडे यांचे वडील पदयात्रेत सहभागी होणार आहेत, असे त्यांनी सांगितले. ही पदयात्रा 12 मार्चला निघणार आहे. सुभाष कच्छवे (परभणी) या पडयात्रेची तयारी करीत आहेत.



# मराठवाडा मित्रमंडळची विद्यार्थी साहाय्यक समितीला दोन कोटींची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यार्थी साहाय्यक समिती मोलाचे आणि उच्च दर्जाचे काम करीत आहे. शिक्षणामुळेच समाजात चांगले बदल होणार आहेत. मराठवाड्यातील गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना समितीच्या सुविधा लाभाव्यात म्हणून मराठवाडा मित्रमंडळ संस्थेने समितीला दोन कोटी रुपयांची आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव गणगे यांनी सांगितले. समितीच्या लजपतराय भवन वसतिगृहातील एका मजल्याला मराठवाडा मित्रमंडळ कक्ष असे नाव देण्यात आले. यावेळी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या. तसेच एक कोटी रुपयांचा धनादेश समितीकडे सुपूर्त करण्यात आला. मराठवाडा मित्रमंडळ संस्थेचे सरचिटणीस किशोर मुंगळे, संस्थेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य बी. व्ही. देशमुख, डॉ. व्ही. एस. पाटील, संजय गर्गे, अण्णासाहेब पवार, प्राचार्य डी. एस. भंडारी, जितेंद्र पवार, तेज निवळीकर, रजिस्ट्रार सुभाष कदम व इतर सदस्य आणि समितीचे कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड, विश्वस्त संजय अमृते, रत्नाकर मते, सुप्रिया केळवकर, तुषार रंजनकर, जिभाऊ शेवाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, कार्यकर्ते, पर्यवेक्षक आदि उपस्थित होते. संस्था शक्यतो एकत्र काम करत नाहीत, परंतु मराठवाडा मित्रमंडळ आणि विद्यार्थी साहाय्यक समिती यांचे कार्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उत्थानाचे असल्याने आणि दोघांचाही हेतू शुद्ध असल्यामुळे आपण एकत्र येत आहोत, असे संस्थेचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांनी सांगितले. समितीचे संस्थापक डॉ. अच्युतराव आपटे यांना फ्रान्समध्ये शिक्षण घेताना ज्या आर्थिक अडचणी जाणवल्या आणि तेथील समाजाने त्यांना मदत केली त्या जाणिवेतून त्यांनी पुण्यात समितीचे काम सुरू केले. समितीमुळे हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन झाले आहे. ग्रामीण भागातील गरजू मुलींसाठी समिती नव्याने वसतिगृह बांधत आहे. दानशूर दाते, निस्पृह कार्यकर्ते आणि कृतज्ञतेच्या जाणिवेतून संस्थेशी जोडलेले माजी विद्यार्थी या सर्वांच्या प्रयत्नातून हे काम पुढे जात आहे, असे समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी सांगितले.

# संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** शासकीय डिजिटल ग्रंथालय घनसावंगी येथे संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी वाचक जयेश होसुरकर, विनोद ढेकळे, ए.डी. पवार रामेश्वर बोरुडकर, शेख अलीम, विष्णू महाजन, आदित्य कोळे, रोहन कोळी, सुदाम राठोड, विशाल घायतडक, विशाल कोळे, तुषार सचिन साळवे, दत्ता कोल्हे, अर्जुन सांगळे, किरण खरात, रामेश्वर बोरडकर, योगेश अधुरे, अभिषेक वावळे, तुषार भुतेकर, भगवान सुरडकर,



दीपाली गायकवाड, गीता गोरे, कादंबरी खोजे, सविता गायकवाड, उषा देशमुख, ग्रंथालयीन कर्मचारी राजेंद्र पगारे हजर होते.

# जखणगाव येथे संत गाडगेबाबा जयंती स्वच्छता अभियानाने साजरी !

आधुनिक केसरी न्यूज

**पारनेर :** श्रीकांत चौरे आरोग्य ग्राम जखणगाव येथे संत गाडगेबाबा जयंती स्वच्छता अभियानाने साजरी गावठाणातील प्रत्येक कुटुंबाला ग्रामपंचायत मार्फत कचरा साठवन पात्र म्हणजे डष्टग्विन वाटण्याचा कार्यक्रम स्वच्छता अभियानात स्वच्छतेसाठी सर्व जाती-धर्मातील नागरिकांची विशेष मनापासून उपस्थिती योगाने शरीर मनाची व झाडूने गावाची स्वच्छता करण्याचा अभिनव उपक्रम या कार्यक्रमाला सरपंच डॉक्टर सुनील गंधे,बाळासाहेब शहाणे, सुभाष सौदागर ,विशाल कर्डिले, नंदा कर्डिले, बबनराव कर्डिले, संजय वैराळ अरुण वाळके, आसिफ शेख गणी शेख, कदीर शेख, नसीम शेख गणेश काळे, महेश सोनवणे, दगडू देवकर ,नाथा गाढवे, तबस्सुम शेख यांचे सह असंख्य नागरिक उपस्थित होते.



# मुख्यमंत्र्यांच्या विरोधात आक्षेपार्ह पोस्ट

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या औरंगाबाद दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आक्षेपार्ह पोस्ट फॉरवर्ड करणाऱ्या ठाकरे गटाच्या शाखाप्रमुखावर पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. देविदास पवार, असे आरोपीचे नाव आहे. तो भारतनगर शिवाजीनगर विभागातील (उबाठा) गटाचा शाखाप्रमुख असल्याचे सूत्रांनी सांगितले. शिवसेना छत्रपती संभाजीनगर अशा नावाचा एक व्हॉट्सअॅप ग्रुप आहे. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात ती आक्षेपार्ह पोस्ट आली. कौन बनेगा करोडपती या मालिकेचा फोटो आक्षेपार्ह पोस्टमध्ये वापरुन शिंदे यांच्या वडलांबद्दल प्रश्न विचारला. ही पोस्ट पाहिल्यानंतर बाळासाहेबांची शिवसेना विभागाचे युवासेना प्रमुख सचिन मिसाळ यांनी पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल करताच देविदास पवार याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला.

# पुण्यातील मिलिंद रथकंठीवार यांना स्वा. सावरकर कार्यगौरव पुरस्कार

## २६ फेब्रुवारीला औरंगाबाद येथे वितरण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या



पुण्यतिथीच्या दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता औरंगाबाद येथील स्व भानुदास चव्हाण सभागृहात राज्यातील व देशभरातील विविध क्षेत्रातील नामवंत २५ जणांना स्वा. सावरकर कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सावरकर प्रेमी मित्र मंडळाच्या वतीने संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक,साहित्य आणि कला क्षेत्रातील योगदानाबद्दल हे पुरस्कार वितरित करण्यात येतील अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष भाऊ सुरडकर यांनी दिली. कार्यक्रमाचे उदघाटन सिने अभिनेता योगेश सोमण यांच्याहस्ते होणार असून नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ योगेंद्रसिंह बिसेन हे अध्यक्षस्थानी राहणार असून,केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ भागवत कराड, राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे यांची मुख्य उपस्थिती राहणार आहे. पुणे येथील सावरकर साहित्याचे अभ्यासक मिलिंद रथकंठीवार हे उत्कृष्ट रेखाचित्रकार असून त्यांनी अनेक प्रदर्शने भरवली आहेत. त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून स्वा.सावरकर यांच्यावर विपुल लेखन केले आहे. भगूर येथे झालेल्या स्वा.सावरकर साहित्य संमेलनाचे कार्यवाह म्हणून काम पाहिले तसेच कंबोडिया येथे झालेल्या जागतिक स्वा.सावरकर साहित्य संमेलनाचे अतिथी वक्ता म्हणून ते निमंत्रित होते. पुण्यातील साहित्यिक व रेखाचित्रकार मिलिंद रथकंठीवार यांना स्वातंत्र्य वीर सावरकर कार्य गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.


नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद



# शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यांसाठी एकदिवसीय धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**
**जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यामध्ये अतिवृष्टी अनुदान मंजूर करणे, सर्व शेतकऱ्यांना पिक विमा मंजूर करणे, शेतमालाचे हमीभाव खरेदी केंद्र सुरु करणे व सक्तीची वीज तोडणी थांबविणे, कापसास बारा हजार रु. तर सोयाबीन साठी आठ हजार रुपये हमी भाव देणे अशा विविध मागण्यासाठी मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तर्फे आजरोजी तहसील कार्यालय जिंतूर या ठिकाणी एक दिवसीय धरणे आंदोलन संपन्न झाले. जिंतूर तालुक्यात मागील वर्षी सप्टेंबर व ऑक्टोबर -२०२२ या महिन्यात सततचा पाऊस व अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाने राज्य शासनाकडे पाठवला होता. या सर्व शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ मदत करणे आवश्यक होते. परंतु, तसे न होता राज्य शासनाने अतिवृष्टी बाधित गटातून जिंतूर तालुका वगळला आहे. तसेच जिंतूर तालुक्यातील १,१३,७८० शेतकऱ्यांनी पिक विमा भरलेला आहे, त्यामध्ये शेतकरी हिस्सा , राज्य शासन हिस्सा व केंद्र शासन हिस्सा असे संयुक्तिक ४१,९४,७८,७५६ /- एवढी रक्कम विमा कंपनीला अदा करण्यात आलेली आहे. त्यामध्ये विमा कंपनीने ३१४,६०,१३,४४८/- एवढ्या रक्कमेच्या नुकसान भरपाईची हमी घेतलेली आहे. त्यापैकी केवळ ७० हजार शेतकऱ्यांनाच १८,६४,५०,१९५/- रु एवढाच पिक विमा मिळाला आहे किंवा मिळणार आहे. तालुक्यातील ईतर विमा धारक शेतकऱ्यांचे नुकसान पाहता सर्व शेतकऱ्यांना विमा मिळणे आपेक्षित आहे, त्यामुळे राज्य शासनाने वरील बाबीचा गांभीर्यपूर्वक विचार करून संबंधित पीकविमा कंपनीला जिंतूर तालुक्यातील सर्व विमा धारक शेतकऱ्यांना विमा देण्यासाठी आदेशित करावे.
यावेळी प्रसादराव बुधवंत, अजयभैय्या चौधरी, विश्वनाथ राठोड, बाळासाहेब घुगे, मुरलीधर मते, अभिनय राऊत, गणेशराव इलग, बाळासाहेब भांबळे, विजय खिस्ते, शरदराव मस्के, मनोज थिटे, मनीषाताई केंद्रे, मनोहर डोईफोडे, चंद्रकांत बाहीरट, संजय( बंटी ) निकाळजे, सोहेल सर, उस्मान पठाण, आहेमद बागबान, मधुकर भवाळे, खयुम कादरी, बी.जी. चव्हाण, मधुकर देशमुख वस्सा, शौकत लाला, आक्कु लाला प्रवीण चव्हाण, सलीम काझी यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फिर्यादीच निघाला आरोपी


## घेरडी येथील पेट्रोल पंपावर चोरीचा बनाव

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र कांबळे**
**सांगोला :** घेरडी ता. सांगोला येथील श्याम पेट्रोल पंपावरील सुमारे २ लाख १६ हजार रुपये रोकड चोरीप्रकरणाचा सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अवघ्या १० तासाच्या आत छडा लावून चोरीचा पर्दाफाश केला. फिर्यादी हर्षद गजानन सोनवणे, रा. घेरडी यानेच चोरीचा बनाव केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी हर्षद सोनवणे ताब्यात घेऊन अटक केली आहे. पोलिसांनी त्याच्याकडून चोरलेले सुमारे २ लाख १६ हजार रुपये हस्तगत केले आहेत. सदर आरोपीस गुरुवार २३ रोजी न्यायालयात करण्यात येणार असल्याचे सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांनी सांगितले.
डोक्याला कान टोपी व तोंडाला रुमाल बांधून स्कार्पिओ जीप मधून आलेल्या अज्ञात चौघांनी पेट्रोल पाहिजे असे म्हणत पंपावरील कामगाराच्या गळ्याला चाकू लावून लॉकर मधून सुमारे २ लाख १६ हजार रुपयेची रोकड लुटून नेल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री २ च्या सुमारास घेरडी ते वाणी चिंचाळे ता सांगोला जाणाऱ्या रोडवरील शाम पेट्रोल पंपावर घडली होती. याबाबत, कामगार हर्षद गजानन सोनवणे रा. घेरडी याने पोलिसात चौघाविरुद्ध फिर्याद दिली होती. दरम्यान घटनेची माहिती व फिर्याद घेऊन सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप पोलीस पथकासह शाम पेट्रोल पंपावर दाखल झाले. यावेळी पोलिसांच्या पथकाने फिर्यादी हर्षद सोनवणे व कामगार चैतन्य सरगर यांच्याकडे वेगवेगळी सखोल चौकशी केली. यावेळी हर्षदकडे विचारपूस केल्यानंतर तो बुचकळ्यात पडला व त्यानेच प्लॅन करून चोरीचा बनाव केल्याचे कबुली दिली तर कामगार चैतन्य सरगर यांने सदर कॅश चोरीचा प्रकार घडला नसून तो हर्षदने बनाव केल्याचे सांगितले. पेट्रोल पंपावर चोरलेले सुमारे २ लाख १६ हजार रुपये हर्षद सोनावणे त्याच्या घराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत खड्डा खोदून पुरून ठेवले होते व कोणाला संशय येऊ नये म्हणून त्याच्यावर गवत टाकले होते. पोलिसांनी पंचा समक्ष सदर रोकड हस्तगत केली आहे. ही कामगिरी सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप पीएसआय शैलेश खेडकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक खाजा मुजावर, पोलीस हेडकॉन्स्टेबल नारायण गोलेकर प्रकाश कारटकर, धनाजी गाडे, अक्षय दळवे, मोहन मनसावाले, अक्षय डोंगरे चालक समीर शेख यांनी केली आहे.

# धुळे पुन्हा हादरले; मोहाडीत तरुणाची निर्घृण हत्या

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** मोहाडी उपनगर येथील तरुणाचे मानेपासून धारदार शस्त्राने तुकडे करून हत्या करण्यात आली. शहरालगत असलेल्या अवधान जवळील सोना दोर कंपनीच्या पाठीमागे शेतात एका तरुणाचा छिन्नविच्छिन्न मृतदेह आढळून आल्याने एकच खडबड उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच मोहाडी पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्याचबरोबर गुन्हे शाखेचे पथक देखील घटनास्थळी धाव घेऊन तपासाला सुरुवात केली आहे. तीस वर्षीय सतीश बापू मिस्त्री राहणार नित्यानंद सोसायटी मोहाडी उपनगर असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. धुळे पोलिसांच्या फॉरेन्सिक टीमने पंचनामा करण्याचे काम सुरू केले आहे. सदर तरुण हा मित्रांसोबत या शेतात रात्री पार्टी करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले असून या पार्टी दरम्यान या तरुणाचा खून झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तवला जात आहे. मोहाडी पोलीस मारेकऱ्यांचा शोध घेत आहेत. सतीश मिस्त्रीच्या खुनाने पुन्हा मोहाडीसह धुळे शहर हादरले असून या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे.



# पडेगाव येथे शिव सप्ताहाचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** पडेगाव येथिल कैलाससिंह राजपूत बहुउद्देशिय सेवाभावी व शैक्षणिक संस्था सूरज राजपूत यांच्याद्वारे आयोजित शिवसप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यात भजन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व बूद्धीबळ स्पर्धा आदिंचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचा समारोप बक्षिस वितरणाने संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हनून पडेगाव येथिल प्रतिष्ठित नागरीक कैलास वाणी, औरंगाबाद जिल्हा वकील संघाचे माजी सचिव अशोक मुळे ,राहुल यलदी, ॲड. अर्चित जाधव, राहुल वाणी, दादाराव शेजवळ,मातोश्री तूळसाई प्रतिष्ठानचे सचिव प्रा. शिवाजी गायकवाड, वंदना मालकर, सूभाष पंडित, सचिन महाजन, जिवन पंडित, कृष्णा जाधव, रोहित भारती आदिंची प्रमूख उपस्थिती होती. मीरानगर येथिल जगताप सर, भोजने सर, सोनवने सर, काळे सर, पवार सर, आकील शेख, सचिन जाधव, विशाल गोरे, आदित्य राजपूत, प्रेम जाधव, विशाल जाधव, किरण गोरे आदींनी कार्यक्रम याशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# नवनीत इंगळे यांना युवारत्न पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**अमरावती :** संजय आठवले व विजय गायकवाड यांच्या वतीने त्यागमुर्ती माता रमाई जयंती निमित्ताने आयोजीत "युवा असावा महत्वकांशी सकारात्मकतेने ओतप्रोत मिळता योग्य दिशा उजळेल प्रगतीची ज्योत" समाजिक क्षेत्रात सतत उल्लेखनीय कामगिरी करत असणारे ग्रामीण युवा संघटनेचे तथा संकल्प बहुउद्देशिय संस्था पारस चे संस्थापक अध्यक्ष मा.नरेंद्र नवनीत इंगळे यांच्या सामाजिक कामगिरीची दखल घेऊन आज त्यांच्या कामाची पावती म्हणुन अमरावती येथे महाराष्ट्र बेस्ट न्यूज तथा दैनिक मतदार राज यांच्या वतीने "युवारत्न पुरस्कार २०२३" देण्यात आला आहे नरेंद्र नवनीत इंगळे हे एक छोट्याशा गावामध्ये राहून समजात असलेल्या अनेक अडचणीवर मात करत सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असतात रात्र दिवस लोकांची मदत करीत असतात.

संकल्प बहुउद्देशिय संस्था पारस ही त्यांची संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून २०० पेक्ष्या जास्त युवक युवतीचे लग्न सुधा जुळवून आणले आहे व पुणा, अमरावती, अकोला येथे बुद्धीष्ट मॅरेज ब्युरो चालवतात व याच्या माध्यमातून युवक युवती परिचय मेळाव्याचे आयोजन सुद्धा करत राहतात अश्या अनेक प्रकारे नरेंद्र नवनीत इंगळे हे पूर्ण विधर्भामध्ये ग्रामीण युवा संघटनेमध्ये काम करीत असून त्यांना काही महिन्यांपूर्वीच नागपूर येथे "बहुजन समाज मित्र पुरस्कार २०२२" देण्यात आला व आज अमरावती येथे "युवारत्न पुरस्कार २०२३" देण्यात आला आहे.

# सेवा सहयोग फाऊंडेशनच्या किशोरी विकास प्रकल्पाची दशकपूर्ती कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** वयाच्या १२ ते १८ वर्षापर्यंत शारीरिक, भावनिक बदलांना सुयोग्य पद्धतीने सामोरे जाण्यासाठी किशोरींच्या सोबत मैत्रिणीच्या नात्याने उभे राहण्याच्या गरजेतून सेवा सहयोगच्या किशोरी विकास प्रकल्पाला दहा वर्षांपूर्वी सुरुवात झाली. या प्रकल्पाच्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी कर्वेनगर येथील महर्षी कर्वे संस्थेच्या रमा पुरुषोत्तम संकुलाच्या आवारामध्ये सकाळी १० ते ५ दरम्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरवात किशोरी प्रकल्पाच्या प्रमुख राधिका कोंडेजकर यांच्या मनोगताने झाली. उदघाटन प्रमुख पाहुण्या रंगभूमीच्या सुप्रसिद्ध सिनेकलाकार



विभावरी देशपांडे, महर्षी कर्वे संस्थेच्या उपाध्यक्ष विद्या कुलकर्णी आणि सुप्रिया भोसले- हवाई दलाच्या निवृत्त अधिकारी आणि dasalt systems च्या सद्य CSR प्रमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर किशोरी विकास प्रकल्पाच्या १० वर्षाच्या प्रवासावर असाधारित चित्रपट दाखविण्यात आला, आणि प्रेम, मैत्री व आकर्षण या सामाजिक समस्या वर उत्तम पथनाट्य किशोरी विकास प्रकल्प मुंबई विभागाच्या किशोरींनी सादर केले. त्यानंतर विविध समांतर सत्रे आयोजित करण्यात अली. “CSR आणि लाभार्थी परस्परसंवाद” या सत्रात CSR कंपन्यांचे प्रतिनिधी आणि कशोरी विकास प्रकल्पातील मुलींची चर्चा झाली. या सत्रात २५ कंपन्यांचे ५० प्रतिनिधी आणि विकास प्रकल्पतील ६० किशोरींनी आणि सेवा सहयोग च्या ३० समन्वयक स्वयंसेवकांनी भाग घेतला. यात मुलींना प्रत्यक्षपणे कंपन्यांच्या CSR प्रतिनिधींनीबरोबर संवाद साधण्याची संधी मिळाली तसेच CSR प्रतिनीधींनाही मुलींच्या अडचणी त्यांची स्वप्ने जाणून घेण्याची संधी मिळाली. “NGO कट्टा” या सत्रात सेवा सहायोग संस्थेच्या प्रमुख प्रकल्पांच्या कार्यप्रणालीविषयी माहिती देणारे सादरीकरण करण्यात आले (presentation). त्यानंतर सेवा सहयोग आणि इतर सामाजिक संस्थामध्ये याविषयावर चर्चा आणि प्रश्नोत्तरे झाली.

किशोरींसाठी प्रेरणादायी सत्र आयोजित करण्यात आले ज्या सत्रात भारतीय हवाई दलाच्या निवृत्त अधिकारी आणि dasalt systems च्या CSR प्रकल्प निर्देशक (प्रोग्रॅम leader) सुप्रिया भोसले यांनी स्वतःचा प्रवास तसेच भारतीय सैन्य दलात तसेच हवाई दलात कारकीर्द करण्यासाठी चे मार्गदर्शन केले.

किशोरीच्या ग्रुप ॲक्टिव्हिटी आयोजित करण्यात आल्या."चला बुद्धिबळ खेळू या " या ॲक्टिव्हिटी मध्ये १०० मुली,८० कॉर्पोरेट स्वयंसेवक आणि ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. आधी बुद्धिबळ खेळाचे फायदे - तणाव घालविण्यासाठी, समस्या सोडविणे आणि बौद्धिक विकास,स्मरणशक्ती वाढ यासाठी आपण करू शकतो हे सांगितले. २ स्वयंसेवकांनी तो खेळ खेळून दाखविला आणि शेवटच्या १५ मिनिटात या मुली स्वतःहून प्यादी हलवायला लागली. शेवटी अभिप्राय देताना आम्ही हा खेळ पहिल्यादाच पाहिला पण आम्हाला हा खूप आवडला असून आम्ही तो नंतर खेळात राहू असे सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात प्रकल्पाच्या समन्वयक निकिता जाधव, रुचिता पवार आणि क्षितिजा शिर्के यांनी महत्वाची भूमिका पार पडली .





# किती आले किती गेले पण कन्नड सोयगाव - मतदार संघाचा विकास मीच करणार : संजनाताई जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सोयगाव मतदार संघातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नासाठी आता केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांची कन्या संजना जाधव या मैदानात उतरल्या आहे शेतकऱ्यांनसाठी कन्नड तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. शेतकरी यांचे अतिवृष्टीचे आनुदानाचे पैसे, विजबिल माफी करावी, राहीलेल्या गावांचा पोखरा योजनेत सामवेश करावा, महिला बचत गटासाठी कर्ज उपलब्ध करून दयावा, रस्त्याची दुर अवस्था,कापुस, मका, गहु, उस, सोयाबिन पिकांना योग्य भाव मिळावा या साठी संजना जाधव यांचा कन्नड तहसील कार्यालयावर मोर्चा काढुन तहसीलदार संजय वारकड पोलीस निरीक्षक राजीव तळेकर तसेच कृषी अधिकारी बाळराजे मुळीक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संजना जाधव बोलतांनी म्हणाले की तालुक्याचा विकास करण्यासाठी किती आले किती गेले तालुका मात्र तसाच राहीला म्हणुन तालुक्याचा विकास फक्त मिच करणार माझा संघर्ष सुरू आहे आता कन्नड सोयगाव मतदार संघाच्या कामासाठी सदैव संघर्ष करणार आहेत म्हणुन तालुक्यातील सर्व नागरीकानी मला साथ दयावी अशी भावनिक साथ देखील घातली. तसेच वेळो वेळी मी माझे वडील केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या कडुन कन्नड सोयगाव तालुक्यातील माझ्या कार्यकर्तासाठी मदत घेऊ प्रश्न सोडवले आहे व ते सदैव मदत करती असे ही बोलताना म्हणाले. या वेळी बाळासाहेब जाधव, प्रकाश घुले, सुनिल निकम, बाबासाहेब जाधव, जयेश बोरसे ,राम पवार, सिद्धार्थ निकाळजे, मिथुन जाधव ,बादल त्रिभवन, पवण ठाकुर, बाळासाहेब वाघ, वाल्मीक वाघ , आयास शाह , अनिल आल्हाड, ज्ञानेश्वर निकम, सिध्देश्वर झाल्टे तसेच तालुक्यातील हजारो नागरिकांची उपस्थीती होती

## रेलगाव येथे शिवजयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील रेलगाव येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली फुलंब्री युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस मनोज तुकाराम चिकटे यांनी मनोगत व्यक्त करताना बालकांना सुसंस्कृत घडवणे व उद्याचे सुजन नागरिक बनवणे हीच खरी शिवजयंती असल्याचे म्हटले आहे यावेळी वाणेगाव सरपंच अर्चना ज्ञानेश्वर जाधव मुळे सर मनोज चिकटे सागर गाडेकर उपसरपंच संतोष तुपे गणेश नागरे दत्ता शिरसागर अजिनाथ गणेश शीरसागर पोलीस पाटील संदीप शीरसागर राहुल गाडेकर सिद्धार्थ शीरसागर सोनू कदम रावसाहेब तांबे भोरया क्षीरसागर गजानन शिरसागर गणपत शिरसागर सोनवणे मधु शिरसागर लक्ष्मण शिरसागर किशोर कदम आदी शिवसैनिक उपस्थित होते.





## विजय आव्हाड यांना 'समाजभूषण' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सुलतानपूर, खुलताबाद तालुक्यातील एसगाव येथील विजय आव्हाड यांना नुकताच लहुजी साळवे विकास परिषदेच्या वतीने क्रांतिगुरू लहुजी साळवे 'समाजभूषण' पुरस्कार एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. औरंगाबाद येथील संत एकनाथ रंगमंदिरात क्रांतिगुरु लहुजी साळवे विकास परिषद महाराष्ट्र संघटनेच्या राज्यस्तरीय सामाजिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी अध्यक्ष उत्तम कांबळे, प्रदीप सरोदे, प्रा. संजय गायकवाड, प्रा. संजय सांभाळकर, प्रमोद कांबळे, प्रदेश अध्यक्षा सुवर्णा उमक, नगरसेविका प्रज्ञा राजपूत आदीची उपस्थित होती.

## राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मौजे ताडपिंपळगांव ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे ग्रामपंचायत व गावातील नागरिक यांच्याकडून स्वच्छतेचे जनक तसेच समाज प्रबोधन करणारे संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली त्यावेळी उपस्थित ताडपिंपळगाव गावातील प्रथम नागरिक सरपंच अरुण सोनवणे सर, संत गाडगेबाबा वर पीएच. डी सुरू असलेले भारत बल्हाळ सर, तसेच गावातील पोलीस पाटील म्हणून कार्यरत असलेले प्रकाश दिवेकर, रामनाथ जाधव, गणेश जाधव , गणेश मालकर, संतोष बल्हाळ, मधुकर सोनवणे, शाईनाथ जाधव बाबाजी, योगेश सोमिनाथ सोनवणे, कारभारी मालकर सर, शिवसिंग महेर, बब्रुवहन मगरे, तात्यासाहेब थोरात, रामराव शिरसे, बापू मुंजाळ सर, शेखर शिरसे, सोपान मालकर, सोमिनाथ मालकर, निलेश सोनवणे, तुळशीराम सोनवणे, बाबासाहेब जाधव, कार्तिक सोनवणे ग्रा. प. सदस्य, साहेबराव सोनवणे ग्रा. प. सदस्य, दत्तू सोनवणे उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शिंदे साहेब दारू - शिंदी तस्कारांना वेसण घालणार ?

## करखेली, नायगाव (ध) व सायखेडा येथून पोहचविली जाते दारू

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** पोलीस स्टेशनचे नव नियुक्त पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी नुकताच पदभार स्वीकारला मात्र त्यांच्या समोर शहरातील व ग्रामीण भागात बोकाळलेल्या अवैध व्यवसायाला वेसन घालण्याचे आव्हान असणार आहे.

ग्रामीण भागातील करखेली, नायगाव ( ध ) व सायखेडा येथून मोठ्या प्रमाणात देशी दारू अवैध रित्या गावागावात पोहचविली जात आहे.लायसन्सधारक मद्य विक्रेते काही पंटर



हाताशी धरून गावागावात दारू सप्लाय करीत आहेत. पोलीस उप निरीक्षक शिव प्रसाद कत्ते यांच्या धाकामुळे यांच्या मनात भीती होती. परंतु त्यांची बदली झाल्यामुळे या तस्करांना रान मोकळे झाल्यासारखे वाटत आहे. नायगाव ( ध ) येथून तर सीमेलगत असलेल्या तेलंगणात हो मोठया देशी दारुचे बॉक्स सप्लाय केल्या जातात अशी चर्चा आहे. गावागावात सहजपणे दारू - शिंदी उपलब्ध होत असल्यामुळे अल्पवयीन बालके, तरुण व्यसनाच्या आहारी लागून अनेक जणांचे कुटुंब उध्वस्त होत आहेत. पोलीस स्टेशनचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे हे स्वतः लक्ष घालून यांच्या मुसक्या अवळणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# फुलंब्री तालुक्यात वन्यप्राण्याचा धुमाकूळ

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील शेरोडी परिसरात गेल्या काही दिवसापासून रानडुक्कर व नीलगाई यांनी धुमाकूळ घातला असून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात मक्का व फळबागाचे नुकसान होत आहे त्यामुळे शेतकरी धास्तावले असून वनविभागाने बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे तालुक्यातील शिरोडी वाहेगाव डोंगरगाव वाणेगाव पिंपळगाव या भागात मोठ्या संख्येने रानडुकरे आहे इतर वन प्राण्यांचा संचार आहे लोकमत समाचारचे पत्रकार अफसर शेख,सोपान शेळके, शिवाजी जेठे,शिवाजी आटूळे, कारभारी जेठे,जनार्धन वेताळ यांनी माहिती दिली. फरजाना कैसर शेख गट नंबर १४३ मध्ये २० आर क्षेत्र मक्का पीक आले होते परंतु दोन दिवसापासून रानडुकरांनी पूर्ण नुकसान केली प्रतिक्रिया शेख फरजाना कैसर शेख ममुराबाद जून महिन्यापासून खूप पाऊस झाल्याने खरीप पिके खराब झाल्यामुळे हिवाळ्यामध्ये मक्का घेतली होती ती सुद्धा रानडुकराने खराब केली. सोपान शेळके शेरोडी माझी 45 आर मक्का रानडुकराने खराब केली माझी 70 हजाराची नुकसान झाली. सुदाम आटूळे शेरोडी वन प्राण्यांचा वनविभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी करीत आहे.

# किनगाव येथे संत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** किनगाव येथे आज  संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली असून या प्रसंगी ह. भ. प ज्ञानेश्वर महाराज राउत यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले राउत महाराज यांनाही संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा व शैक्षणिक सामाजिक जीवनात गाडगेबाबा योगदानाबद्दल त्यांना सविस्तर असं मार्गदर्शन केले व बाबा यांचे शिष्य रामलाल बाबांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली याप्रसंगी सरपंच मनिषा चव्हाण ग्रामविकास अधिकारी अरुण चिते साहेब तेजराव चव्हाण देवनाथ सोनवणे शंकर चव्हाण सुभाष गोविंद चव्हाण रामराव पाटील भाऊसाहेब चव्हाण शिवाजी चव्हाण किशोर सोनवणे पर्जन्य चव्हाण चंद्रशेखर चव्हाण कैलास नारायणकर उत्तम चव्हाण अनिल चव्हाण अंकुश देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी काढण्यात आलेल्या रांगोळी चे सर्वांनी कौतुक केले सौ वैशाली शिंदे प्रिती सोनवणे कांचन सोनवणे. सुप्रिया शिंदे यांनी परिश्रम घेतले होते. या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब शिंदे यांनी केले.

# एसटीची दुचाकीला धडक

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मोर्शी ते अमरावती मार्गावर एसटी बसने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात पाच वर्षीय बालक जागीच ठार झाला, तर त्याचे आई-वडील गंभीर जखमी झाले. ही घटना डवरगाव फाट्यावर गुरुवारी दुपारी घडला. अन्वित पंकज वलगावकर ( ५ ) रा. अंतोरा आष्टी, जि. वर्धा असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी डवरगाव येथे महामार्ग रोखून दीड तास रास्ता रोको केले. माहुली जहागीर पोलिसांनी घटनास्थळ गाठून तातडीने जखमींना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले व परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. वर्धा जिल्ह्यातील अंतोरा आष्टी येथील पंकज वलगावकर हे पत्नी कविता आणि मुलगा अन्वित यांच्यासह आपल्या दुचाकी क्र. एमएच ३२/ एक्यू ६११० ने अमरावती येथे काही कामानिमित्त येत असताना मागून येणाऱ्या वरूड ते अमरावती ( एसटी क्र.एमएच ०६/ एस ८९५९ ) बसने दुचाकीला धडक दिली. यामध्ये समोर बसलेला अन्वित एसटी बसच्या चाकाखाली येऊन जागीच ठार झाला, तर पंकज आणि कविता दोघेही गंभीररित्या जखमी झाले. घटनेनंतर डवरगाव येथील संतप्त नागरिकांनी क्षणातच महामार्ग बंद केला.डवरगाव येथील महामार्गावर अनेकदा अपघात झाले असून, या ठिकाणी गतिरोधक बसवावे या मागणीसाठी शेकडो निवेदने प्रशासनाला देण्यात आली आहे, मात्र प्रशासनाने काहीच हालचाली न केल्याबद्दल रोष व्यक्त केला. माहुली जहागीर पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन तातडीने जखमींना रुग्णालयात दाखल केले.

# लग्नसोहळ्यातून २० तोळे सोने लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लग्नसोहळ्यातून चोरट्यांनी नववधूचे तब्बल २० तोळे सोने लंपास केले होते. ही धाडसी चोरी एका विधिसंघर्षग्रस्त बालकाच्या मदतीने तीन ते चार आरोपींनी केली. पोलिसांनी या विधिसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेत त्याच्याकडून ९ लाख २१ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व एक चारचाकी वाहन, असा एकूण १७ लाख २१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मात्र, या चोरीतील चार आरोपी फरार आहेत.

भानापेठ येथील सूरज पेद्दुलवार यांच्या बहिणीचे लग्न नागपूर मार्गावरील शकुंतला लॉन येथे होते. लग्नासाठी आणण्यात आलेले १६ लाख रुपयांचे सोन्या-चांदीच्या दागिन्यांची पर्स अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची तक्रार पेद्दुलवार यांनी रामनगर पोलीस ठाण्यात केली.

# पत्रकार वारीसे यांच्या कुटुंबीयांना राज्य पत्रकार संघाची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील वाशेळे येथील मयत पत्रकार  शशिकांत वारीसे यांच्या कुटुंबीयांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी भेट घेऊन आजारी मातोश्री व मुलगा, बहीण यांचे  सांत्वने केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार राज्य संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व राज्य संघटक संजय भोकरे यांनी या परिवाराला  मदत करण्यासाठी शिष्टमंडळाला पाठवले होते.  यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने या परिवाराला रोख रक्कम देण्यात आली. डॉ. विश्वासराव आरोटे कोकण विभाग संपर्कप्रमुख बाजीराव फराकटे, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष आबा खवणेकर, मनोहर हिंगणे, सुनिल आरोटे चंदर शिंदे उपस्थित होते.





# समाजाचे काहीतरी देणे लागतो, ही भावना प्रत्येकाच्या मनात असली पाहिजे : डॉ. विश्वासराव आरोटे

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**सिंधुदुर्ग :** राज्य पत्रकार संघाच्या वतीने 365 दिवस आपण विविध उपक्रम राबवत असतो. हे उपक्रम राबवत असताना आपण या समाजाचे काहीतरी देणे लागतो, ही भावना प्रत्येकाच्या मनात असली पाहिजे. ही भावना प्रत्येकामध्ये आली तर नक्कीच हा समाज आपल्याला डोक्यावर घेतल्याशिवाय राहणार नाही. चांदा ते बांदा हा प्रत्येक पक्षाचा नारा असतो, त्याप्रमाणे राज्य मराठी पत्रकार संघाने देखील चांदा ते बांदा याप्रमाणे आज बांद्यामध्ये जो कार्यक्रम घेतला, समाजामध्ये अनेक जण काम करत असतात अशा उपेक्षित कार्यकर्त्यांना त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन त्यांना उभे राहण्याचे कार्य राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून नक्कीच केले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांधा येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी बोलताना केले.

यावेळी व्यासपीठावर उद्योजक विशाल परब, श्री श्री १०८ महंत मठाधीश प.पू.सद्गुरू गावडे काका महाराज, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष आबा खवणेकर, सेवानिवृत्त कॅप्टन शंकर भाईप,राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोकण विभागीय अध्यक्षा अर्चना घारे-परब, बांदा सरपंच प्रियांका नाईक, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ कोकण विभाग संपर्क प्रमुख बाजीराव फराकटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पश्चिम मुंबई जिल्हाध्यक्ष रमेश परब,माजी शिवसेना महिला तालुकाप्रमुख अपर्णा कोठावळे, बांदा वैद्यकीय अधिकारी डॉ.जगदीश पाटील, राष्ट्रवादीचे सावंतवाडी तालुकाध्यक्ष पुंडलिक दळवी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ गोवा संपर्क प्रमुख शिवाजी नेहे, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार वेल्फेअर असोसिएशन जिल्हा सरचिटणीस राकेश केसरकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी यश मिळविणारे कु.समिका चिपकर, सुचिता कांडरकर, विराज परब, किरण देसाई, गजानन गाड, गौरवी पेडणेकर, तेजस माने,तर नवनिर्वाचित बांदा सरपंच प्रियांका नाईक, कास सरपंच प्रविण पंडीत,निगुडे सरपंच लक्ष्मण निगुडकर, शेर्ले सरपंच प्रांजल जाधव या सर्वांचा मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

मला आज अभिमान वाटतो की सिंधुदुर्ग जिल्ह्यात शहरातील पत्रकार कमी असले तरी एक पत्रकार काय करू शकतो त्याची ताकद आम्हाला माहिती आहे, "तुम्ही मला केव्हाही हाक मारा विशाल फाऊंडेशन कायम पत्रकारांच्या पाठीशी असेल "असे प्रतिपादन भाजप युवा नेते तथा उद्योजक विशाल परब यांनी बांदा येथील आनंदी मंगल कार्यालय येथे आयोजित महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई/सिंधुदुर्ग संलग्न इलेक्ट्रॉनिक्स मीडिया मराठी पत्रकार संघाच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात काढले.

# कापूस पिकला, अजून नाही विकला, कापसाने भरले घर, आलं बघा धोक्याचं सरकार, लय खाजू येती खरखर

## शाहीर लक्ष्मण हिरें'चे गीत सोशल मीडियावर व्हायरल; दैनिक आधुनिक केसरी'ने घेतली दखल

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.बाळासाहेब बोराडे**

जालना : सध्या पांढऱ्या सोन्यामुळे शेतकरी बांधवांची फारच दयनीय अवस्था झाली.भाव वाढले या आशेवर शेतकरी बसला. मागील तीन महिन्यापासून कापूस घरात पडून आहे. त्यास पिसा झाल्याने शेतकरी कुटुंबातील सदस्य बिमार पडत आहेत. आर्थिक कोंडी झाल्याने शेतकरी हदबल झाला आहे. कापसामुळे झालेले हाल पाहून बदनापूर तालुक्यातील चिखली येथील शेतकरी शाहीर लक्ष्मण हिरे यांनी कापसावर भाष्य करणारे लोकगीत रचले असून ते सोशल मीडियावर खुप व्हायरल होत आहे. हे गीत एकूण तरी सरकारला जाग येईल काअशी चर्चा सोशल मीडियावर रंगत आहे. प्रा.बाळासाहेब बोराडे यांनी शाहीर लक्ष्मण हिरे यांच्याशी संवाद साधला आहे. शाहीर लक्ष्मण हिरे हे एक सामान्य शेतकरी आहेत. बदनापूर तालुक्यातील चिखली दाभाडी येथील रहिवासी आहेत. त्यांना लोकगीते रचण्याचा छंद आहे. शेती कामात सवड मिळाली की ते जागर, गोंधळाचेही कार्यक्रम करतात. या कार्यक्रमातुन ते आपली लोकगीतं सादर करतात. त्यांनी कोरोना काळातील महामारीवरही गीते लिहली आहेत. शाहीर हिरे हे शेतकरी असल्या कारणाने कापसामुळे शेतकरी कुटुंबाचे काय हाल झाले हे त्यांनी जवळून अनुभवले व त्यावर आधारित गीत लिहिले. सोशल मीडियावर हे गीत मोठया प्रमाणावर व्हायरल होत असून त्यांना अनेकांचे फोनही येत आहेत.हे गीत एकूण तरी सरकररला सद्बुद्धी येणार का असा प्रश्न शेतकऱ्यांकडून केला जात आहे. शाहीर हिरे आपल्या गीतात म्हणतात की कापूस पिकला खरा परंतु अजूनही विकला नाही.कापसाच्या पिसामुळे खाज येऊन शेतकरी बिमार पडत आहे. दिवसरात्र कष्ट करून पांढरं सोनं पिकवलं खर परंतु बेभाव विकण्याची वेळ आली आहे. त्यामुळे शेतकरी कुटुंबात ताणतणाव निर्माण होत आहेत. खत, औषधींचे भाव गगनाला भिडले असून शेतकऱ्यांच्या माला विषयी कुणीच बोलत नाही. शेतकऱ्यांच्या पिकांवर व्यापारी मालेमाल झाले परंतु आजही शेतकरी हलाखीचे जीवन जगत आहे. शाहीर लक्ष्मण हिरे यांनी समस्त शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या आहेत. त्यामुळे सरकारने निर्णय घेऊन कापसाला योग्य भाव द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांडून होत आहे.त्यांची ही मागणी रास्त आहे. कारण शेतकरी टिकला तरच देश टिकेल हे विसरून चालणार नाही.

मोठ्या कष्टाने कापूस पिकवला . आज तो घरात पडून आहे .कापसाला पिसा झाल्या आहेत .सावकारी कर्ज कसे फेडावे .मुलामुलींचं शिक्षण,लग्न, कुटुंबाचा खर्च कसा भागवायचा . पांढऱ्या सोन्यामुळे शेतकऱ्यांचे वाटोळे झाले .सामान्य शेतकऱ्यांचे जीवनमान धोक्यात आले आहे . गोड बोलून गळा कापला जात आहे . त्यामुळे लवकरात लवकर निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य तो भाव द्यावा .

**शाहीर लक्ष्मण हिरे, चिखली**



# पोलीस प्रशासनाला खांद्याला खांदा लावून कार्य करणारी मातृभूमी कमांडो रेस्क्यू फोर्स

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** संपूर्ण महाराष्ट्र भरात कमांडो फोर्स च्या माध्यमातून अनेक सेवाभावी कार्य सुरू असून, जेव्हा जेव्हा सरकारी यंत्रणेला पोलीस डिपार्टमेंटला यात्रा उत्सव, शिवजयंती, गणेशोत्सव, नवरात्र, पूर, सामाजिक कार्यक्रमात बंदोबस्तसाठी, कमांडोची कमतरता पडते, त्या त्या वेळेस मातृभूमी कमांडो रेस्क्यू फोर्सची टीम ही तत्पर सेवा देण्यासाठी उभी असते. ही फोर्स अनेक वर्षा पासून पश्चिम महाराष्ट्र भरात कार्य करीत असून आता आपल्या उत्तर महाराष्ट्र विभागात, विदर्भ व मराठवाडा विभागात ही जोमाने कार्य करताना दिसत आहे. जेव्हा संपूर्ण जगात कोरोना पसरलेला होता त्या वेळेस जीवाची पर्वा न करता पोलीस प्रशासन यंत्रणा यांच्या सोबत खांद्याला खांदा लावून गोवोगावी जाऊन रात्री बेरात्री पेट्रोलिंग करून अनेक लोकांना वेळेवर हॉस्पिटलमध्ये पोहचवून जीव वाचवण्याचे देवदूताचे कार्य केले आहे , या बद्दल प्रशासनाने फोर्सच्या कार्याची दखल घेऊन फोर्सचे प्रदिप पाटील यांना अनेक वेळेस गौरविण्यात ही आलेले आहे. वेळोवेळी फोर्सच्या माध्यमातून युवकांना प्रेरणा, पोलीस भरती, स्पर्धा मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन ही केले जात असते. फोर्स उभी करण्या मागचा उद्देश सांगतांना प्रदिप पाटील यांचे मनन्हे आहे की जे विद्यार्थी पोलीस भरतीत किंवा आर्मी भरतीत काही कारणाने भरती होऊ शकत नसतात. व त्यामुळे काही विद्यार्थी आत्महत्या कडे वळतात, स्वतः खचून जातात, अश्या युवकांना डिपार्टमेंट सोबत ड्यूट्या करून स्वप्न पूर्ण पणे करू शकतात.

आपली फोर्स अश्याच युवकांची जोडणी करून प्रशिक्षण देऊन समुपदेशन करून पुन्हा त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य करीत आहेत . समाजाचे देणं लागतो, या उद्देशाने आपणास आरक्षण नाही तर स्वरक्षणाची गरज आहे आणि फोर्स मध्ये येऊन आपण स्वत :चा परिवाराचे ही रक्षण केले तरी भरपूर आहे, असे ते युवकांना समजून सांगत असतात , जसे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी मावळे उभे केले होते, तसे संपूर्ण महाराष्ट्र भरात कमांडो फोर्सच्या माध्यमातून कमांडो उभे करून समाजसेवा , देशसेवा करून ऋण फेडायचे आहेत आज पर्यंत अनेक युवक पोलीस, आर्मी, महाराष्ट्र सुरक्षा दलात भरती झालेले आहेत, अशी माहिती मातृभुमी कमांडो फोर्सचे प्रमुख प्रदिप गोकुळ पाटील यांनी दिली .



# जळगाव जिल्ह्यातील निवडक 330 शाळांचे होणार शाळासिद्धी बाह्यमूल्यमापन

## प्रत्येक केंद्रातील शाळांची निवड : निर्धारकांच्या 60 टीम नियुक्त

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** समग्र शिक्षा अंतर्गत जिल्हाभरातील शाळांचे शाळासिद्धी बाह्यमूल्यमापन करण्याची प्रक्रिया दिनांक 27 फेब्रुवारीपासून सुरू करण्यात येणार असून त्यासाठी जिल्ह्यातील दहा टक्के शाळांची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील 330 शाळांचे बाह्यमूल्यमापन करण्यासाठी शाळासिद्धी निर्धारकांच्या 60 टीम नियुक्त करण्यात आल्या आहेत. शाळासिद्धी समृद्ध शाळा हा केंद्र शासनाच्या न्यूपा नवी दिल्ली अंतर्गत मूल्यांकनाचा कार्यक्रम निर्धारीत केला आहे. या कार्यक्रमांतर्गत शाळांना प्रथम स्वयंमूल्यमापन करायला सांगितले जाते आणि त्यानंतर शासनातर्फे बाह्यमूल्यमापन करण्यात येते. 2020-21 या वर्षात स्वयंमूल्यमापन पूर्ण केलेल्या संपूर्ण महाराष्ट्रातील प्राथमिक स्तरावरील दहा हजार व माध्यमिक स्तरांतील 1851 शाळांचे बाह्यमूल्यमापन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार जळगाव जिल्ह्यातील 278 प्राथमिक शाळा आणि 52 माध्यमिक शाळा अशा एकूण 330 शाळांचे शाळासिद्धी बाह्यमूल्यमापन केले जाणार आहे. त्यासाठी शाळासिद्धीचे प्रशिक्षण घेतलेले साठ निर्धारक आणि तालुकानिहाय गटसाधन केंद्रातील विषय तज्ज्ञ यांच्या एकत्रिकरणातून दोन व्यक्ती असलेल्या 60 टीम तयार करण्यात आल्या आहेत. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे, शाळासिद्धीचे जिल्हा नियंत्रण अधिकारी तथा डायटचे वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. चंद्रकांत साळुंखे, माध्यमिक शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, शाळासिद्धीचे जळगाव जिल्हा समन्वयक डॉ. जगदीश पाटील यांच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यातील शाळासिद्धी बाह्यमूल्यमापनाचे नियोजन केले जात आहे. 2020-21 या वर्षात स्वयंमूल्यमापन केलेल्या शाळांपैकी प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक केंद्रातील शाळा निवडण्यात आली आहे. बाह्यमूल्यमापन कसे करावे यासंदर्भात दिनांक 24 रोजी न्यूपा नवी दिल्ली व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यातर्फे ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानंतर 27 फेब्रुवारी ते 15 मार्च दरम्यान संबंधित शाळांना भेटी देऊन त्यांचे शाळासिद्धी बाह्यमूल्यमापन करण्यात येणार असून ऑनलाईन माहिती अपलोड केली जाणार आहे.



शाळासिद्धी हा केंद्र शासनाचा मूल्यांकनाचा कार्यक्रम असून याअंतर्गत शाळांना दरवर्षी स्वयंमूल्यमापन करायचे असते व त्याची नोंद न्यूपा नवी दिल्ली यांच्या शाळासिद्धी वेबपोर्टलवर केली जाते . त्यानंतर बाह्यमूल्यमापन करण्याची प्रक्रिया आहे . शाळेचा भौतिक विकास होऊन विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता वाढावी यासाठी शाळासिद्धी मूल्यांकनाची 46 गाभा मानके आहेत . बाह्यमूल्यमापनासाठी निवड झालेल्या शाळांनी शाळासिद्धी निर्धारकांना सहकार्य करावे, असे आवाहन शाळासिद्धीचे जिल्हा नियंत्रण अधिकारी डॉ . चंद्रकांत साळुंखे यांनी केले .

सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे मूल्यांकन व प्रमाणीकरण करून घेणे व शाळांची गुणवत्ता आशवासीत करणे महत्त्वाचे असून शैक्षणिक, भौतिक तसेच संस्थात्मक गुणवत्ता वाढीच्या उद्देशाने न्यूपा नवी दिल्ली यांनी शाळा मानके व मूल्यांकन आराखडा तयार केला आहे . त्यानुसार स्वयंमूल्यमापन केले जात असून यंदा बाह्यमूल्यमापन केले जाणार आहे . त्यासाठी प्रत्येक केंद्रातील शाळांची निवड करण्यात आली असून निर्धारकांमार्फत बाह्यमूल्यमापन केले जाईल, असे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तथा डायटचे प्राचार्य डॉ . अनिल झोपे यांनी सांगितले .

# सामाजिक संघटनांना पडतोय पाणपोई सुरु करण्याचा विसर

## पैठण शहरात तृष्णा भागवणारी एकही पाणपोई नाही

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तापमानाचा पारा फेब्रुवारीच्या शेवटी हळुहळु वाढता होतोय त्यामुळे नागरिकांची पाण्यासाठी लाही-लाही होत आहे. असे असले तरी तिर्थक्षेत्र असलेल्या पैठण शहरात उन्हाळ्यात तहानलेल्यांची तृष्णा भागवणारी एकही पाणपोई यावर्षी अद्याप सुरु झालेली नाही. त्यामुळे यावर्षी पैठण शहरातील सामाजिक संस्थांचा पाण्याचा धर्म आटला का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. येत्या १५ दिवसावर नाथ महाराज षष्ठी सोहळा आसुन या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील कान्या कोपर्यातील वारकरी,भाविक लाखोच्या संख्येने पैठण नगरीत येत असतात. त्यात हि यात्रा उन्हाच्या कडाक्यात असते, त्यामुळे येणाऱ्यासाठी पाणपोई उभारून मोफत पेयजल उपलब्ध करुन देण्याची पैठण वासियांची परंपरा होती.मात्र अद्याप कुठेही पाण पोई दिसत नसुन पाणी विक्रीचा व्यवसाय जोर धरत असुन पैठण बसस्थानकावर सुध्दा पिण्यायोग्य पाणि नसल्याने प्रवासी व येणाऱ्या वारकर्यांना विकत बाटलीचे पाणी घ्यावे लागते.

पैठण शहरात पुर्वी विविध सामाजिक, धार्मिक तसेच स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने पाणपोई उभारल्या जात असत, तर काही दानशूर मंडळी, संघटना स्वखर्चाने पाणपोई लावतात. तर काही समाजबांधव वर्गणी गोळा करुन पाणपोई लावत असतात. स्वर्गीय नातेवाईकांच्या स्मरणार्थ देखील शहरात पाणपोई लावून नागरिकांची तृष्णा भागवली जात होती.

परंतु, यावर्षी उन्हाचा पारा वाढत असून तरी देखील शहरातील पाणपोईंची संख्या अद्याप वाढलेली दिसून येत नाही. पाणपोई सुरु झाल्यास खेड्यावरून वरुन पैठण शहरात वैद्यकीय कामांसह विविध कारणांनी येणाऱ्या नागरिकांची मोठी सोय होते असते. दरम्यान, पैठण हे तिर्थक्षेत्र असल्याने येथे मोठ्या प्रमाणात प्रवासी येत असतात. त्यांना या पाणपोईचा आधार मिळतो.




तिर्थक्षेत्र असलेल्या पैठण शहरात उन्हाळ्यात तहानलेल्यांची तृष्णा भागवणारी एकही पाणपोई यावर्षी अद्याप सुरु झालेली नाही . त्यामुळे यावर्षी पैठण शहरातील सामाजिक संस्थांचा पाण्याचा धर्म आटला का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे .

### नाथषष्टी सोहळ्यात वारकर्यांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरवा ....



सध्याच उन्हाचा कडाका वाढत आहे, येत्या १५ दिवसावर नाथ महाराज षष्ठी सोहळ्यास सुरुवात होत आहे या पार्श्वभूमीवर ईथे येणाऱ्या लाखो भाविक वारकर्यांसाठी प्रशासनाच्या वतीने वारकर्यांना व वारकरी फडावर पिण्याचे शुद्ध व थंड पाणी पुरवावे .

**ह .भ .प .ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर**
**अध्यक्ष संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आपेगाव**